॥गणपती बाप्पा मोरया॥

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ७३ ● शुक्रवार, दि.१८ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

## »थोडक्यात

### तृणमूलच्या फुटीर गटाच्या हालचालींना वेग!

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत बंडखोरीनंतर निर्माण झालेला सत्तासंघर्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. भारत निवडणूक आयोगाने पक्षाचे मूळ नाव आणि पक्षचिन्ह गोठवल्यानंतर फुटीर गटाच्या हालचालींना वेग आला आहे. ऋतब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील फुटीर गटाने निवडणूक आयोगाकडे आपल्या नव्या पक्षासाठी तीन संभाव्य नावांचे पर्याय सादर केले आहेत.

--------------------------------

### अन् शिंदे मोबाईल विमानातच विसरले!

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा मोबाइल विमानातच विसरला. लंडन दौऱ्यावरून मुंबईत परतल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. घरी पोहोचल्यानंतर पहाटे ३ वाजताच्या सुमारास मोबाईल नसल्याचे लक्षात आले. सुरक्षाव्यवस्थेतील पोलिसांची तातडीने धावपळ केली. ब्रिटिश एअरवेजच्या विमानतळावरील सुरक्षा कार्यालयाशी संपर्क साधला, शोध घेतल्यानंतर पहाटे ४ वाजता मोबाइल सापडला अशी चर्चा माध्यमांमध्ये होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या कार्यालयातून मात्र अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे स्पष्ट केले आहे. यापूर्वीही मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदेंचा मोबाईल गहाळ झाला होता.

--------------------------------

### सप्टेंबरच्या शेवटी राज्यात पावसाचे पुनरागमन!

मुंबई : राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली, तर काही जिल्हे अद्यापही पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. अशातच बंगालच्या उपसागरात हवामानातील बदलामुळे महाराष्ट्रात पावसाचे पुनरागमन होत आहे. येत्या २० ते २५ सप्टेंबरदरम्यान महाराष्ट्र आणि गोवा परिसरामध्ये पावसात मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांना दिलासा मिळणार असून, अंतर्गत भागातही पावसाचा जोर वाढणार आहे, असे ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले आहे. अहिल्यानगर, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांत मध्यम पावसाची शक्यता आहे.

# निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांचा गुलाम!



## विजय वडेट्टीवारांचा घणाघात; मतदार यादीत २ कोटी ६६ लाखांचा घोळ

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**मुंबई :** राज्यातील आगामी निवडणुकांच्या तोंडावर मतदार याद्यांमधील संभाव्य घोळावरून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी निवडणूक आयोगावर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. राज्यातील तब्बल २ कोटी ६६ लाख मतदारांच्या नोंदींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, अल्पसंख्याक आणि एससी-एसटी बहुल मतदारसंघांमधील मतदार जाणीवपूर्वक वगळले जात असल्याचा दावा त्यांनी केला आहे.तसेच,निवडणूक आयोगाची भाषा आणि कार्यपद्धती पाहता आयोग सत्ताधाऱ्यांचा गुलाम झाल्यासारखा वागत आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत केली. मतदारांबाबत निवडणूक आयोगाने पारदर्शक आणि सविस्तर माहिती जाहीर करावी, अशी मागणी विरोधी पक्षाकडून करण्यात आली आहे. यासंदर्भात बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्रातील विशेष सखोल पुनर्निरीक्षण (एसआयआर) नुसार स्थलांतरित, मृत आणि दुबार नोंदी असलेले मिळून जवळपास २ कोटी ६६ लाख ८८ हजार ४७८ मतदारांवर प्रश्न निर्माण झाला आहे. याचाच अर्थ राज्यातील तब्बल २१.४१ टक्के मतदार अंतिम यादीतून वगळले जाण्याची दाट शक्यता आहे. या आकडेवारीचे सविस्तर विश्लेषण करताना त्यांनी सांगितले की, यापैकी ७६ लाख ७६ हजार १३५ मतदार 'स्थलांतरित' आणि ७५ लाख ४१ हजार ५२० मतदार 'गैरहजर' म्हणून दाखवण्यात आले आहेत. विसंगतीच्या नावाखाली ६२ लाख ४८ हजार २८१ मतदार दाखवले आहेत. हा सगळा एकत्रित आकडा दोन कोटींच्या पुढे जातो, जो अत्यंत संशयास्पद आहे.

### आयोगाच्या हेतूवरच शंका!

वडेट्टीवार यांनी निवडणूक आयोगाच्या हेतूवरच शंका उपस्थित केली. ते म्हणाले, राज्यातील ३८ अल्पसंख्याक किंवा मुस्लिम बहुल मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणावर मतदार वगळले गेले आहेत. हा आकडा तब्बल २९.७७ टक्के इतका मोठा आहे.

### आयोग कोणाच्या इशाऱ्यावर काम करीत आहे?

काही विशिष्ट मतदारसंघांत २१ टक्के आणि मुस्लिम बहुल क्षेत्रात २९ टक्के मतदान कमी झाल्याचे दाखवून आयोग कोणाच्या इशाऱ्यावर काम करत आहे, असा थेट सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. या नव्या आकडेवारी आणि आरोपांमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापण्याची चिन्हे आहेत.

# शिवसेना, राष्ट्रवादीनंतर आता तृणमूल काँग्रेसवर संकट!

## राहुल गांधी यांच्या पोस्टने राजकीय वर्तुळात भूकंप

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**दिल्ली :** ममता बॅनर्जी यांच्या ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस पक्षाचं नाव आणि चिन्ह आयोगाकडून गोठवण्यात आल्यानंतर राहुल गांधी यांनी मोदी सरकार आणि निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केला आहे.

शिवसेना, राष्ट्रवादीनंतर आता तृणमूल काँग्रेसवर संकट आले आहे, भाजप आणि निवडणूक आयोग मिळून पक्ष फोडत असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. लोकशाहीच्या सध्याच्या स्थितीवर चिंता व्यक्त करताना राहुल गांधी यांनी मोदी सरकार आणि आयोगावर टीका केली. ते आपल्या ट्विटमध्ये म्हणाले की, मते चोरीला जाणे, सरकार चोरीला जाणे आणि आता अख्खा पक्षच चोरला जाणे ही आपल्या लोकशाहीच्या अधोगतीची स्पष्ट चिन्हे आहेत. जनतेच्या कौलाचे रक्षण करणे ही निवडणूक आयोगाची घटनात्मक जबाबदारी असताना, आयोग मात्र याउलट जनादेश बदलणाऱ्या ताकदींनाच मदत करत आहे. ही लढाई केवळ ममता बॅनर्जी किंवा एका पक्षापुरती मर्यादित नसून, देशात स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुका इच्छिणाऱ्या प्रत्येक राजकीय पक्षाची आणि मतदाराची आहे, असेही त्यांनी ठामपणे मांडले.



### ही आपल्या लोकशाहीच्या अधोगतीची चिन्हे!

आधी शिवसेना, नंतर राष्ट्रवादी आणि आता तृणमूल काँग्रेस प्रत्येकवेळी तोच तोच पॅटर्न – भाजप आणि निवडणूक आयोग मिळून एक पक्ष फोडतात आणि नंतर त्या पक्षाचे अधिकृत चिन्हच हिरावून घेतात. जेव्हा संपूर्ण पक्षच्या पक्षच चोरला जाऊ शकतो, तेव्हा करोडो भारतीयांची मते चोरली जाणे यात काहीच नवल नाही. ही आपल्या लोकशाहीच्या अधोगतीची चिन्हे बनली आहेत, असा घणाघात राहुल गांधी यांनी केला.

# थातूरमातूर नाही, शेतकऱ्यांना ठोस मदत देणार: बावनकुळे

प्रतिनिधी १८ सप्टेंबर



**नागपूर :** राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांना थातूरमातूर मदत न करता भविष्यात भक्कम आधार मिळेल, अशी सर्वंकष उपाययोजना राज्य सरकार करणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे. नागपूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी स्पष्ट केले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत दुष्काळाच्या विषयाला सर्वोच्च प्राधान्य दिले असून, प्रशासनाला थेट बांधावर उतरण्याचे आदेश दिले आहेत. पुढील ७ ते ८ दिवसांत दुष्काळाचा सविस्तर अहवाल येईल आणि त्या आधारे केंद्र व राज्य सरकारकडून मदतीचा ठोस निर्णय घेतला जाईल. याशिवाय 'महाखनिज २.०' धोरण, शक्तिपीठ महामार्ग, आजारी बालिकेचा उपचार आणि राजकीय घडामोडींवर त्यांनी सविस्तर भाष्य केले. राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्राबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, 'दुष्काळाच्या मुद्द्यावर कोणीही राजकारण करण्याची गरज नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अत्यंत संवेदनशील असून, मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्व विषय बाजूला ठेवून त्यांनी दुष्काळाला 'टॉप प्रायॉरिटी' दिली आहे. महसूल, कृषी, मदत व पुनर्वसन विभागासह सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कामाला लावले आहे.' १८ जिल्ह्यांचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असला तरी केवळ त्या आधारे निर्णय घेता येत नाही. सोयाबीन, कापूस, संत्रा आदी पिकांचे नेमके किती नुकसान झाले, याचा अंतिम अहवाल पुढील मंगळवार-बुधवारपर्यंत म्हणजेच ७ ते ८ दिवसांत येईल. २०१७ किंवा २०१८ च्या शासन निर्णयांच्या धर्तीवर शेतकऱ्यांना दिलासा दिला जाईल. 'मी स्वतः काही जिल्ह्यांमध्ये जाऊन प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. सर्व पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि आमदारांना मतदारसंघात फिरून शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.' पूर्वीच्या चारा छावण्यांमध्ये मक्तेदारांनी भ्रष्टाचार केल्याचे आमच्या लक्षात आले आहे. त्यामुळे यंदा चारा छावण्या किंवा डेपो सुरू करताना कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची काटेकोर खबरदारी घेतली जाईल. तसेच परतीच्या पावसाने हजेरी लावल्यास दुष्काळाची तीव्रता कमी होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

# राज्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करा - शरद पवार

## देवेंद्र फडणवीसांना पत्र; राज्यातील भीषण परिस्थितीकडे वेधले लक्ष

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

पुणे : यंदा राज्यातील बहुतांश भागात पावसाने पाठ फिरवल्याने शेतकरी वर्ग मोठ्या संकटात सापडला आहे. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण जनता मोठ्या संकटात सापडली आहे. पावसाअभावी सोयाबीन, कापूस, बाजरी, मका, तूर, मूग व उडीद ही उभी पिके पूर्णपणे करपून गेली असून पिकांवर कीड-रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे राज्यात शेती, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तातडीचे पत्र लिहून राज्यातील भीषण परिस्थितीकडे लक्ष वेधले आहे. पत्राद्वारे शरद पवारांनी कोणत्याही औपचारिक निकषांची वाट न पाहता राज्यात तत्काळ दुष्काळ घोषित करण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ५० हजार रुपयांची



मदत, संपूर्ण कर्जमाफी, १ रुपयात पीकविमा, विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफी आणि चारा छावण्या सुरू करण्यासारख्या ९ प्रमुख व महत्त्वाच्या मागण्या त्यांनी प्रशासनासमोर ठेवल्या आहेत. ग्रामीण जनजीवनावरील हे संकट लक्षात घेऊन सरकारने यावर तातडीने सकारात्मक पावले उचलावीत. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील पर्जन्यमान, पिकांची स्थिती, पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि पशुधनाची स्थिती यावर दररोज देखरेख ठेवण्यासाठी राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष सुरू करावेत. दुष्काळसदृश परिस्थितीग्रस्त तालुक्यांतील शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्थांमध्ये दुष्काळ सवलतींमध्ये केवळ परीक्षा शुल्क माफ न करता, शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करण्याचा निर्णय तातडीने घ्यावा, अशी ठाम मागणीही त्यांनी केली आहे. शेतकरी, शेतमजूर, पशुधन आणि ग्रामीण जनजीवनावर निर्माण झालेल्या या गंभीर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, वरील मागण्यांवर मुख्यमंत्री महोदय सकारात्मक निर्णय घेत तातडीने आवश्यक उपाययोजना करतील, अशी अपेक्षाही शरद पवार यांनी पत्रातून व्यक्त केली आहे.



राष्ट्रवादी अजित पवार गटाचे महानगर अध्यक्ष विजय भाऊ देशमुख यांच्या निवासस्थानी विराजमान जेष्ठा गौरी

# शरद पवार राष्ट्रवादी पक्ष नव्या महिला अध्यक्षाची निवड करणार!

**पुणे :** शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षात महिला विंगमध्ये मोठा बदल होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्ष पद विदर्भाकडे जाणार आहे. नागपूर विभागातून महिला अध्यक्ष निवडला जाणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. खानदेशमधून रोहिणी खडसे यांनी महिला अध्यक्ष म्हणून गेल्या तीन वर्षात सरस कामगिरी केली आहे. त्यांना या पदावर तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानंतर आता त्यांच्या जागी नवीन महिला अध्यक्ष नियुक्त करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महिला अध्यक्ष पद नागपूर विभागात देण्यात येणार आहे. महिला अध्यक्ष पदी डॉ. अंजली साळवे यांची लवकरच नियुक्ती होणार आहे. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या हस्ते पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. रोहिणी खडसे यांनी ३ वर्ष कालावधी पूर्ण केल्यानंतर आता साळवे यांचाकडे जबाबदारी सोपवण्यात येणार आहे.

# अल्पवयीन मुलीवर 5 जणांकडून अत्याचार!

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यात एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर ५ जणांनी वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात या आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, एका महिन्यापूर्वीच म्हणजे २३ ऑगस्ट रोजी देखील म्हसळा तालुक्यात एका अनुसूचित जातीच्या एका अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची घटना घडली होती. त्यामुळे एका महिन्यात ही दुसरी घटना घडल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

पीडित मुलीच्या तक्रारीनुसार, तिच्या ओळखीच्या तरुणांनी तिला धमकावून आणि फसवून वारंवार अत्याचार केलं आहे.

तसेच एप्रिल ते जून २०२६ दरम्यान, पीडितेच्या घराचे बांधकाम करणाऱ्या एका ४० वर्षीय मिस्त्रीने घरात कोणी नसल्याचा गैरफायदा घेत जबरदस्तीने घरात शिरून अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी म्हसळा पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ६४(२)(ड), ३७६(२) आणि पोक्सो अधिनियम कलम ४, ६ अन्वये या सर्व आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा अधिक तपास म्हसळा पोलीस ठाण्याचे सपोनि चव्हाण करत आहेत.






# व्हायरल इन्फेक्शन केसेस वाढल्या

हवामानातील बदल (ऊन-पाऊस-थंडीचा खेळ), वाढता दमटपणा किंवा संसर्गाचा प्रसार यामुळे सध्या व्हायरल इन्फेक्शन (विषाणूजन्य संसर्ग) च्या केसेस वेगाने वाढत आहेत. या काळात लहान मुले आणि ज्येष्ठांना संसर्ग होण्याचा धोका सर्वाधिक असतो.

**प्रमुख लक्षणे :** अचानक जोरात किंवा सौम्य ताप येणे आणि थंडी वाजणे घसा खवखवणे, सर्दी, खोकला आणि शिंका येणे तीव्र अंगदुखी, डोकेदुखी आणि सांधेदुखी थकवा, अशक्तपणा आणि भूक न लागणे काहींमध्ये मळमळ, उलट्या किंवा जुलाब संसर्ग वाढण्याची मुख्य कारणे: हवामानातील बदल: तापमानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती क्षीण होते. संसर्गाचा प्रसार: बाधित व्यक्तीने खोकल्याने किंवा शिंकल्याने हवेद्वारे विषाणू पसरतात. स्वच्छतेचा अभाव: हात न धुणे किंवा अस्वच्छ हातांनी नाक-तोंडाला स्पर्श करणे.

**घ्यावयाची काळजी व उपाय :** भरपूर द्रवपदार्थ घ्या: कोमट पाणी, लिंबू पाणी किंवा सूप प्या जेणेकरून डिहायड्रेशन होणार नाही.

# जीवन! हे सहज नसतं; ते जगायचं असतं!

जीवन... चार अक्षरांचा हा शब्द; पण त्यामध्ये संपूर्ण विश्व सामावलेले आहे. जीवन म्हणजे केवळ श्वास घेणे, दिवस ढकलणे, पैसा कमावणे, मोठे घर बांधणे किंवा मुलांना मोठ्या पदावर पोहोचवणे नव्हे. जीवन म्हणजे स्वतःच्या अस्तित्वाला अर्थ देणे, माणूस म्हणून जगणे आणि आपल्या जगण्यामुळे इतरांच्या आयुष्यातही आनंद, आधार आणि माणुसकीची ज्योत पेटवणे होय.

**जीवन सहज नसतं; ते जगायचं असतं!**

आपले जीवन आपले असले, तरी ते केवळ स्वतःसाठी जगता येत नाही. आपल्या आयुष्याशी अनेक नाती, माणसं, समाज आणि भावभावना जोडलेल्या असतात. म्हणूनच प्रत्येकाने स्वतःच्या सुखासोबत इतरांच्या सुखाचाही विचार करायला हवा. जीवनामध्ये काहीच स्थिर नाही. प्रत्येकाला जगण्यासाठी एक मर्यादित वेळ मिळालेला आहे. तो वेळ कसा वापरायचा, हे मात्र आपल्या हातात आहे. जगायचे म्हणजे केवळ जगत राहायचे नसते; तर आपल्या जगण्याचे सार्थक करायचे असते. या जगात कोणीही अमरत्वाचा पट्टा घेऊन आलेले नाही. मृत्यू अटळ आहे, पण त्याआधी आपण कसे जगलो, किती माणसे जोडली, किती मनांना आधार दिला आणि समाजाला काय दिले, हेच आपल्या जीवनाचे खरे मोजमाप ठरते. आज मात्र माणूस अनेकदा माणसापासूनच दूर जाताना दिसतो. ज्यांच्यावर आपण मान, सन्मान आणि विश्वास ठेवतो, तेच कधी कधी आपल्याला हिणवतात, दुखावतात किंवा अपमानित करतात. अशा वेळी प्रश्न पडतो शिक्षित कोण आणि अडाणी कोण? अडाणी शिक्षित की शिक्षित अडाणी? शिक्षणाने पदवी मिळते; परंतु माणुसकी शिकावी लागते. ज्ञानाने बुद्धी समृद्ध होते; पण संस्कारांनी मन समृद्ध होते. पैसा माणसाला श्रीमंत करू शकतो; पण प्रेम, आपुलकी आणि संवेदनशीलता विकत घेता येत नाही.आज अनेकांच्या हातात पैसा भरपूर आहे; परंतु एकमेकांसाठी वेळ नाही. घर मोठे झाले, गाड्या महाग झाल्या, सुखसोयी वाढल्या; पण मनामधील आपुलकी कमी होत चालली आहे. एकेकाळी आपल्या संस्कृतीत 'अतिथी देवो भवः' ही भावना होती. आज परिस्थिती अशी झाली आहे की, 'अतिथी न येवो, देव!' अशी मानसिकता निर्माण होताना दिसते.माणुसकी तोंडी लावण्यापुरती शिल्लक राहू नये, ही काळाची गरज आहे.गेल्या काही दशकांत समाजात आमूलाग्र परिवर्तन झाले. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, पैसा आणि आधुनिक जीवनशैलीने माणसाचे जीवन बदलले. हे परिवर्तन आवश्यकही होते. मात्र या परिवर्तनाच्या प्रवाहात आपण नाती, संस्कार, ऋणानुबंध आणि माणुसकी तर गमावत नाही ना, याचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

## आजच्या काळातील आणखी एक चिंतेची बाब म्हणजे नात्यांमधील वाढता व्यवहार

पूर्वी माणसं भावनिक होती, म्हणून नाती जपत होती. नंतर माणसं 'प्रॅक्टिकल' झाली आणि नात्यांमध्ये व्यवहार शोधू लागली. आता अनेक ठिकाणी माणूस 'प्रोफेशनल' झाला आहे.फायदा असेल तरच नाते जोडायचे! परंतु आयुष्याच्या प्रत्येक ठिकाणी व्यवहार चालत नाही. काही नाती ही व्यवहाराच्या पलीकडे असतात. काही माणसं आपल्या आयुष्यात येतात ती फायद्यासाठी नव्हे, तर ऋणानुबंधासाठी. अशा नात्यांना जपणे गरजेचे आहे. कारण ऋणानुबंध जपले की संस्कार निर्माण होतात, मनाला समाधान मिळते आणि जीवन समृद्ध होते.गरजा कधीच पूर्ण होत नाहीत. एका गरजेपाठोपाठ दुसरी गरज उभी राहते. पैसा वाढतो, अपेक्षा वाढतात आणि अपेक्षांबरोबर असमाधानही वाढते. म्हणूनच जीवनात संपत्तीपेक्षा समाधान मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.आपल्या आवडत्या माणसाचे आपल्या सोबत असणे ही आयुष्यातील सर्वांत मोठी कमाई असते. मात्र अशी माणसं प्रत्येकाच्या वाट्याला येतातच असे नाही. नशिबाने एखादे प्रेमळ, समजूतदार आणि निस्वार्थी माणूस आयुष्यात आले, तर त्याला हळुवारपणे जपले पाहिजे. कारण अशी माणसे पैसा देऊन मिळत नाहीत; ती नात्यांच्या ऊबेतून मिळतात.

चुकीच्या लोकांच्या संगतीत राहिलात तर तुमच्यावरही त्यांच्या सावलीचा परिणाम होतो. त्यामुळे माणसांची निवड करताना सावध असणे आवश्यक आहे. मात्र एकटेपणाची भीती बाळगून चुकीची नाती स्वीकारण्यापेक्षा काही काळ एकटे राहणे अधिक चांगले. मनःशांती ही कोणत्याही नात्यापेक्षा मोठी संपत्ती आहे. परिवर्तन हा जगाचा नियम आहे. परिवर्तन थांबवता येत नाही. काळ बदलणार, तंत्रज्ञान बदलेल, जीवनशैली बदलेल, विचार बदलतील आणि समाजही बदलेल. प्रश्न परिवर्तनाचा नाही; प्रश्न आहे तो परिवर्तनाच्या दिशेचा!आपण येणाऱ्या पिढीकडून अपेक्षा करतो की त्यांनी अधिक चांगला समाज घडवावा. पण त्यासाठी आजच्या पिढीने त्यांना योग्य संस्कार, योग्य मूल्ये आणि माणुसकीचा वारसा दिला पाहिजे.

आपल्याला असा विकास हवा आहे, ज्यामध्ये पैसा असेल; पण माणुसकीही असेल. तंत्रज्ञान असेल; पण संवेदनशीलताही असेल. मोठमोठ्या इमारती असतील; पण मनांची दारेही उघडी असतील. शिक्षण असेल; पण संस्कारही असतील. स्पर्धा असेल; पण सहकार्याची भावना हरवलेली नसेल.

जीवन सहज नाही; ते जगायचे असते.

जगायचे म्हणजे स्वतःसाठीच नव्हे, तर इतरांसाठीही जगायचे असते.पैसा कमवायचा, पण माणसं गमवायची नाहीत. पद मिळवायचे, पण मुळे विसरायची नाहीत. प्रगती करायची, पण माणुसकी मागे सोडायची नाही.आणि परिवर्तन स्वीकारायचे, पण ते चांगल्या दिशेने घडवायचे! कारण शेवटी आपल्या आयुष्याची खरी कमाई बँक खात्यात नसते; ती आपण जोडलेल्या माणसांच्या मनात असते. म्हणूनच आज प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे."मी किती मिळवले?" यापेक्षा "मी किती दिले?""मी किती मोठा झालो?" यापेक्षा "मी किती चांगला माणूस राहिलो?"आणि "माझ्यानंतर माझी किती माणसं मला प्रेमाने आठवतील?" याच प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे म्हणजेच कदाचित सार्थक जीवनाची खरी ओळख!

आजची पिढी उद्याचा समाज घडवणार आहे. त्यामुळे नवीन पिढीबद्दल तक्रार करण्यापूर्वी आपण स्वतःकडे पाहिले पाहिजे. मुले ही आई-वडिलांचे प्रतीक आणि प्रतिबिंब असतात. मुलांमध्ये संस्कारांचा अभाव जाणवत असेल, तर त्यामागे आपल्या संस्कारपद्धतीतील कमतरता शोधली पाहिजे. मुलांनी मोठे शिक्षण घेतले, उच्च पद मिळवले, भरपूर पैसा कमावला म्हणजे त्यांचे आयुष्य यशस्वी झाले असे नाही. त्यांनी चांगला माणूस ओळखला, चांगल्या माणसांशी नाते जपले, गरजूंच्या वेदना समजून घेतल्या आणि समाजासाठी काही करण्याची भावना मनात ठेवली, तरच त्यांच्या शिक्षणाचे खरे सार्थक झाले असे म्हणता येईल.आपण कोणत्या पदावर आहोत, यापेक्षा आपली मुळे कुठे आहेत, हे विसरता कामा नये. राहणे ही कमजोरी नसून मोठेपणाची खूण आहे. आपण ज्या समाजातून घडलो, त्या समाजाचे काही देणे लागतो, ही जाणीव प्रत्येकाच्या मनात असायला हवी. शब्द आणि कृती यांची ताकद बंदुकीच्या गोळीपेक्षा कमी नसते. गोळी एकदा सुटली की परत येत नाही; त्याचप्रमाणे तोंडातून निघालेला शब्दही परत घेता येत नाही. म्हणून बोलताना आणि वागताना विचार करायला हवा. आपल्या एका शब्दाने कोणाचे मन फुलू शकते आणि त्याच शब्दाने कोणाचे मन कायमचे दुखावलेही जाऊ शकते.

पुरुषोत्तम काळबांडे, नागपूर
संवाद:-9403341432

# दलित साहित्याला मुख्य प्रवाहात आणण्यात मोठे योगदान असणारे साहित्यिक!

## आज समीक्षक भालचंद्र फडके यांचा स्मृतिदिन



डॉ. भालचंद्र दिनकर फडके हे मराठीतील एक ख्यातनाम समीक्षक, लेखक आणि दलित साहित्याचे मर्मग्राही भाष्यकार होते. त्यांचा जन्म १३ मे १९२५ रोजी धरवाड येथे झाला.त्यांनी पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात आणि इतर ठिकाणी महत्त्वपूर्ण शैक्षणिक व साहित्यिक कार्य केले. त्यांचा 'मराठी कथेची वाटचाल (१८००-१९५०)' हा पीएच.डी.चा प्रबंध मराठवाडा विद्यापीठाने १९६७ मध्ये स्वीकृत केला होता. डॉ. भालचंद्र फडके यांची समीक्षा मर्मग्राही आणि सामाजिक भान असलेली होती. दलित साहित्याला मुख्य प्रवाहात आणण्यात आणि त्याचे मूल्यमापन करण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. वेदना आणि विद्रोह (१९७७) हे त्यांचे दलित साहित्यावरील अत्यंत प्रसिद्ध समीक्षात्मक पुस्तक आहे, ज्याने मराठी साहित्यात मोठी चर्चा घडवून आणली. कथाकार खानोलकर (१९६९) बा. भ. बोरकर, ग. ना. कानोलकर यांच्या साहित्याचा त्यांनी घेतलेला मागोवा महत्त्वपूर्ण ठरला. मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन (१९८०): महिला लेखिकांच्या साहित्याचा व त्यांच्या समस्येचा घेतलेला वेध. याशिवाय त्यांनी कथासंग्रह आणि चरित्रात्मक साहित्याचे संपादन व लेखनही केले आहे. मराठी दलित साहित्याला तात्त्विक आणि सामाजिक आधार देणारे समीक्षक म्हणून त्यांचे नाव नेहमी आदराने घेतले जाते.

भालचंद्र फडके यांचे माध्यमिक शिक्षण सोलापूरच्या जैन गुरुकुल व हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर येथे झाले. सोलापूरच्याच दयानंद महाविद्यालयामधून पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते पुणे विद्यापीठातून मराठी घेऊन एम.ए. झाले. मराठी कथा या विषयावर त्यांनी विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवी संपादन केली. पुढेही त्यांचा 'मराठी कथा' हा काही प्रमाणात अभ्यासाचा विषय राहिला.

ह.भ.प.दिनकरबुवा फडके यांचे ते चिरंजीव. वडील राष्ट्रीय कीर्तनकार म्हणून प्रख्यात होते, हिंदू महासभेच्या विचारांचे होते. मात्र त्यांची मुले सुधारणावादी, प्रायः साम्यवादी समाजवादी अशा डाव्या विचारसरणीकडे झुकणारी होती. भालचंद्र फडकेही त्याला अपवाद नाहीत.

सुरुवातीस काही काळ भारतीय युद्ध खात्यात नोकरी केल्यानंतर निवृत्तीपर्यंत फडके यांनी अध्यापन हाच पेशा निवडला. १९४५ ते १९५५ असे एक दशक माध्यमिक शिक्षक म्हणून त्यांनी काम केले. त्यानंतर मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद आणि शासकीय महाविद्यालय येथे मराठीचे अध्यापन केले. हा सगळा काळ चौदा वर्षांचा होता. १९६९ साली ते पुणे विद्यापीठात रुजू झाले. प्रथम अधिव्याख्याता आणि १९७८ साली प्रपाठक झाले. १९८५ साली निरंतर प्रौढ शिक्षण संचालक म्हणून ते निवृत्त झाले. फडके मराठीतील ख्यातनाम समीक्षक होते त्यांची समीक्षेवरील अनेक पुस्तके आहेत, त्यांपैकी 'कथाकार खानोलकर' (१९६९), 'दलित साहित्य: वेदना आणि विद्रोह' (१९७७), 'मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन' (१९८०) ही काही प्रसिद्ध पुस्तके असून त्यामुळे त्यांच्यावर 'समीक्षक' ही मुद्रा उमटली. त्यांची समीक्षा मर्मग्राही, सामाजिक भान जागे करणारी आणि काही प्रमाणात प्रेरणा देणारी होती. दलित साहित्याचा त्यांनी वेळोवेळी घेतलेला धांडोळा साक्षेपी समीक्षेचा एक चांगला प्रकार होता.त्यांनी अरविंद गोखले यांच्या कथा संपादित केल्या आहेत आणि कथांची अन्य संपादित पुस्तके ही त्यांच्या नावावर आहेत.

डॉ.आंबेडकरांवर त्यांनी चरित्रपर लेखन केले. १९७३ ते १९७६ या काळात मराठी साहित्य पत्रिकाचे (पुणे) ते संपादक होते. त्या काळातील नामवंत समीक्षकांचे लेखन प्रसिद्ध करून त्यांनी पत्रिकेचा दर्जा उंचावला. त्यांची संपादकीय व समीक्षकीय दृष्टी चिकित्सक होती.भालचंद्र फडके यांचे १८ सप्टेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. (काही नोंदींनुसार १७ सप्टेंबर किंवा १६ सप्टेंबर).

# ई.व्ही. रामासामी 'दक्षिण-पूर्व आशियाचे सॉक्रेटिस'!

इरोड वेंकटप्पा रामासामी हे जगभरात 'पेरियार' (तामिळ भाषेत अर्थ: महान व्यक्ती किंवा आदरणीय वडील) या नावाने प्रसिद्ध आहेत. हे दक्षिण भारतातील एक महान समाजसुधारक, राजकारणी आणि द्रविड चळवळीचे प्रणेते (जनक) होते.



त्यांनी तामिळनाडू आणि दक्षिण भारतात सामाजिक समानता, महिलांचे हक्क आणि जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी क्रांतिकारी लढा दिला. १७ सप्टेंबर १८७९, इरोड (तामिळनाडू) एका श्रीमंत व्यापारी कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव इरोड वेंकटप्पा रामासामी नायकर असून त्यांचे औपचारिक शिक्षण केवळ प्राथमिक स्तरापर्यंत (पाचवीपर्यंत) झाले, परंतु त्यांच्याकडे प्रचंड बुद्धिमत्ता आणि तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता होती. पेरियार यांनी समाजातील अनिष्ट रूढी-परंपरा, अंधश्रद्धा आणि जातीय विषमतेवर तीव्र प्रहार केले. १९२५ मध्ये त्यांनी स्वाभिमान चळवळीची सुरुवात केली. उपेक्षित आणि शोषित जातींमधील लोकांमध्ये आत्मसन्मान जागवणे, हा या चळवळीचा मुख्य उद्देश होता. ब्राह्मणी वर्चस्वाला विरोध करत त्यांनी 'पुरोहित नसलेली लग्ने' लावण्यास प्रोत्साहन दिले. केरळमधील वायकोम येथील मंदिराच्या रस्त्यांवर अस्पृश्यांना चालण्याची बंदी होती. या अन्यायाविरुद्ध पेरियार यांनी तीव्र आंदोलन केले आणि त्यांना तुरुंगवासही झाला. या आंदोलनामुळे त्यांना 'वायकोम वीर' (वायकोमचे नायक) ही पदवी मिळाली. १९४४ मध्ये पेरियार यांनी 'जस्टिस पार्टी'चे रूपांतर 'द्रविडर कळघम' या सामाजिक-राजकीय संघटनेत केले. ही संघटना पूर्णपणे बिगर-राजकीय होती आणि तिचा उद्देश द्रविड संस्कृतीचे जतन करणे व सामाजिक सुधारणा घडवून आणणे हा होता. त्यांनी उत्तर भारतीय संस्कृती आणि हिंदी भाषेच्या लादण्याला कडक विरोध केला. दक्षिण भारतातील राज्यांसाठी त्यांनी स्वतंत्र 'द्रविडीस्तान'ची मागणी देखील लावून धरली होती. पेरियार हे पूर्णपणे बुद्धिवादी आणि निरीश्वरवादी होते. त्यांनी देव, धर्मग्रंथ आणि मानवनिर्मित जातीव्यवस्था पूर्णपणे नाकारली. 'मानव धर्म एकच आहे आणि तो म्हणजे मानवता,' असे त्यांचे मत होते. महिलांच्या हक्कांसाठी पेरियार यांनी मोठे काम केले. त्यांनी बालविवाहाला विरोध केला, विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले आणि महिलांना मालमत्तेत समान अधिकार मिळायला हवेत, अशी भूमिका घेतली. महिलांनी स्वतःचे निर्णय स्वतः घ्यावेत, यावर त्यांचा भर होता. तमिळ भाषा शिकणे सोपे व्हावे, म्हणून त्यांनी तमिळ लिपीत काही महत्त्वपूर्ण सुधारणा सुचवल्या, ज्या नंतर तामिळनाडू सरकारने अधिकृतपणे स्वीकारल्या. वारसापेरियार यांच्या विचारांनी तामिळनाडूच्या राजकारणाला आणि समाजकारणाला कायमची दिशा दिली. तामिळनाडूतील आजचे प्रमुख राजकीय पक्ष हे पेरियार यांच्या द्रविड विचारसरणीतूनच पुढे आले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या युनेस्को संस्थेने १९७० मध्ये पेरियार यांना 'आधुनिक युगाचे प्रेषित' आणि 'दक्षिण-पूर्व आशियाचे सॉक्रेटिस' म्हणून गौरवले होते.

### काशी तीर्थयात्रा घटना

१९०४ मध्ये, पेरियार काशी विश्वनाथच्या पूजनीय शिव मंदिराला भेट देण्यासाठी काशीच्या तीर्थयात्रेला गेले. हिंदू धर्मातील सर्वात पवित्र स्थळांपैकी एक मानले जात असले तरी , त्यांनी भीक मागणे आणि मृतदेह तरंगवणे यासारख्या अनैतिक गोष्टी पाहिल्या. जेव्हा त्यांनी ' ब्राह्मणी शोषण' म्हटले त्याचा अनुभव घेतला, तेव्हा त्यांची निराशा सर्वसाधारणपणे कार्यात्मक हिंदू धर्मापर्यंत पसरली. पेरियार, अंदाजे १९१० च्या दशकात तथापि, काशीमधील एका विशिष्ट कथित घटनेचा पेरियार यांच्या विचारसरणीवर आणि भविष्यातील कार्यावर खोलवर परिणाम झाला. पूजास्थळी पाहुण्यांना मोफत जेवण दिले जात असे. पेरियार यांना धक्का बसला की, केवळ ब्राह्मणांनाच जेवण देणाऱ्या धर्मशाळांमध्ये त्यांना जेवण नाकारण्यात आले. तीव्र भुकेमुळे, पेरियार यांना उघड्या छातीवर पवित्र जानवे घालून ब्राह्मणाचा वेष धारण करून एका भोजनालयात प्रवेश करणे भाग पडले , परंतु त्यांच्या मिशांमुळे ते ओळखले गेले. मंदिराच्या द्वारपालाने असा निष्कर्ष काढला की पेरियार ब्राह्मण नाहीत, कारण हिंदू शास्त्रानुसार ब्राह्मणांना मिशा ठेवण्याची परवानगी नाही. त्याने केवळ पेरियार यांना आत जाण्यापासून रोखले नाही, तर त्यांना उद्धटपणे रस्त्यावर ढकलले. भूक असह्य झाल्यामुळे पेरियार यांना रस्त्यावरील उरलेले अन्न खाण्यास भाग पडले. याच सुमारास त्यांच्या लक्षात आले की, ज्या खानावळीत त्यांना प्रवेश नाकारण्यात आला होता, ती दक्षिण भारतातील एका श्रीमंत गैर-ब्राह्मणाने बांधली होती. या भेदभावपूर्ण वृत्तीमुळे पेरियार यांच्या हिंदू धर्मावरील विश्वासाला धक्का बसला, कारण काशीमध्ये त्यांनी पाहिलेल्या घटना, सर्वांचे स्वागत करणाऱ्या पवित्र स्थळाच्या त्यांच्या मनात असलेल्या प्रतिमेपेक्षा पूर्णपणे वेगळ्या होत्या. काशीच्या भेटीपर्यंत पेरियार आस्तिक होते, त्यानंतर त्यांचे विचार बदलले आणि ते नास्तिक झाले.

# गणपती Special... अंकातून व्यक्तिमत्त्वाचा शोध

## मूलांक 3 – स्वप्न मोठं असेल... तर आकाशही छोटं वाटतं!

काही माणसं फक्त स्वप्न पाहत नाहीत...
त्या स्वप्नाला दिशा देतात.
काहीतरी नवीन शिकायचं,
काहीतरी वेगळं करायचं,
स्वतःची ओळख निर्माण करायची
आणि एकदा ध्येय ठरलं की—
"हे मला करून दाखवायचंच!"

ही जिद्द मूलांक ३ च्या व्यक्तिमत्त्वात अनेकदा दिसून येते. ज्यांचा जन्म ३, १२, २१ किंवा ३० तारखेला झाला आहे, त्यांचा मूलांक ३ मानला जातो. अंकशास्त्रानुसार मूलांक ३ वर गुरूचा प्रभाव मानला जातो. त्यामुळे ज्ञान, शिक्षण, महत्त्वाकांक्षा, creativity, आत्मविश्वास आणि इतरांना मार्गदर्शन करण्याची वृत्ती यांच्याशी या अंकाचा संबंध जोडला जातो.

ज्ञानाची भूक... आणि काहीतरी मोठं करण्याची इच्छा मूलांक ३ ची व्यक्ती एखादी गोष्ट शिकली की ती स्वतःपुरती ठेवेलच असं नाही.

"मला समजलं... आता इतरांनाही समजावून सांगायचं!" हा स्वभाव अनेकदा दिसतो. म्हणूनच Teaching, Education, Management, Writing, Public Speaking, Law, Administration, Business आणि Creative क्षेत्रांमध्ये त्यांची आवड किंवा क्षमता दिसू शकते.

त्यांच्या मनात कल्पना भरपूर असतात. कधी एकाच वेळी दहा गोष्टी सुरू करण्याची इच्छा होते! पण इथेच एक महत्त्वाचा धडा आहे—कल्पना कितीही मोठी असली तरी तिचं Execution आणि सातत्य तितकंच महत्त्वाचं असतं. "मला माझी वेगळी ओळख निर्माण करायची आहे!" मूलांक ३ व्यक्तीला अनेकदा स्वतःच्या क्षमतेचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करायचा असतो. त्यांना growth हवी असते. Recognition आवडतं. आपल्या कामाची दखल घेतली जावी असं वाटतं. आणि जेव्हा त्यांना योग्य दिशा, योग्य वातावरण आणि योग्य संधी मिळते, तेव्हा त्यांची महत्त्वाकांक्षा मोठ्या ध्येयात बदलू शकते.

पण याच बाजूची दुसरी छटा आहे—

कधी कधी स्वतःचं मत योग्य असल्याचा अतिविश्वास, impatience किंवा इतरांचं मत न ऐकण्याची वृत्ती अडथळा ठरू शकते. म्हणून मूलांक ३ साठी एक सुंदर धडा—

ज्ञान वाढवा... पण त्यासोबत नम्रताही वाढवा. काही प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांकडे पाहूया...

स्वामी विवेकानंद — १२ जानेवारी

स्वामी विवेकानंदांच्या जीवनात ज्ञान, विचार, आत्मविश्वास आणि समाजाला दिशा देण्याची शक्ती स्पष्टपणे दिसते. त्यांनी केवळ ज्ञान मिळवलं नाही, तर ते ज्ञान समाजापर्यंत पोहोचवलं. त्यांच्या विचारांनी तरुणांना स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्याची प्रेरणा दिली. ज्ञान स्वतःपुरतं न ठेवता त्यातून इतरांना दिशा देणं—मूलांक ३ च्या ऊर्जेचं एक सुंदर उदाहरण म्हणून त्यांच्याकडे पाहता येतं.

जेफ बेझोस — १२ जानेवारी

जेफ बेझोस यांच्या प्रवासात मोठं विचार करण्याची वृत्ती, नवीन कल्पना, दीर्घकालीन दृष्टी आणि विस्ताराची महत्त्वाकांक्षा दिसते. एका ऑनलाइन पुस्तकविक्रीच्या कल्पनेपासून सुरुवात करून त्यांनी Amazon ला जागतिक स्तरावरील मोठ्या व्यवसायात विकसित केलं.

मूलांक ३ च्या संदर्भात पाहिलं तर—

मोठी कल्पना + महत्त्वाकांक्षा + सातत्यपूर्ण कृती = काहीतरी मोठं निर्माण करण्याची शक्यता.

त्यांच्या प्रवासातून एक गोष्ट नक्कीच लक्षात येते—

"सपने वो नहीं जो नींद में आते हैं,
सपने वो हैं जो आपको सोने नहीं देते।"

रजनीकांत — १२ डिसेंबर. साध्या पार्श्वभूमीतून आलेल्या व्यक्तीने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली. रजनीकांत यांच्या प्रवासात मेहनत, आत्मविश्वास, style आणि स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची जिद्द दिसते. लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही त्यांची स्वतःची वेगळी personality कायम राहिली. गर्दीत असतानाही स्वतःची ओळख निर्माण करणं—ही मूलांक ३ ची एक महत्त्वाची बाजू मानली जाते.




Money आणि Career

मूलांक ३ व्यक्तीसाठी पैसा अनेकदा growth आणि achievement शी जोडलेला असू शकतो. त्यांना फक्त कमाई करायची नसते—काहीतरी वाढवायचं, निर्माण करायचं, स्वतःचा स्तर उंचवायचा असतो. Business मध्ये असतील तर expansion. Job मध्ये असतील तर higher position. Teaching मध्ये असतील तर स्वतःची teaching style. Creative field मध्ये असतील तर स्वतःची वेगळी ओळख. पण लक्षात ठेवा—मोठं विचारणं महत्त्वाचं आहे,पण मोठ्या विचाराला रोजच्या छोट्या कृतीची जोड देणं त्याहून महत्त्वाचं आहे.

Relationships मध्ये मूलांक ३

मूलांक ३ व्यक्ती प्रेमळ आणि expressive असू शकते. पण नात्यांमध्ये त्यांना respect आणि appreciation देखील महत्त्वाचे वाटू शकतात. कधी कधी आपल्या विचारांवर जास्त ठाम राहिल्यामुळे मतभेद होऊ शकतात.

म्हणून नात्यासाठी एक छोटासा मंत्र—"ऐकून घेणं म्हणजे हार मानणं नाही...कधी कधी ते नातं जिंकणं असतं."

मूलांक ३ ची खरी ताकद

ज्ञान आहे...कल्पना आहेत...महत्त्वाकांक्षा आहे...पण या सगळ्याला जेव्हा शिस्त, सातत्य आणि योग्य दिशा मिळते, तेव्हा व्यक्ती स्वतःसोबत इतरांनाही पुढे घेऊन जाऊ शकते. आणि म्हणूनच मूलांक ३ मध्ये Teacher, Mentor, Leader किंवा Guide होण्याची प्रवृत्ती दिसू शकते.

"रास्ते मुश्किल हैं तो क्या हुआ,
मंज़िल भी तो खास होनी चाहिए...
हौसला रखो, कदम बढ़ाते रहो,
ज़िंदगी में अपनी पहचान होनी चाहिए।"

कारण मूलांक ३ च्या व्यक्तीची गोष्ट फक्त स्वप्नांची नसते...ती स्वप्नांना आकार देण्याची गोष्ट असते. गणपती बाप्पांचा संदेश, गणपती म्हणजे बुद्धी, विवेक आणि योग्य निर्णयाची आठवण. मूलांक ३ साठी संदेशही तसाच—मोठी स्वप्नं बघा...मोठे विचार करा, पण अहंकारापेक्षा ज्ञानाला आणि ज्ञानापेक्षा विवेकाला मोठं ठेवा.

"उड़ान बड़ी हो तो आसमान छोटा लगने लगता है, बस हौसला ज़िंदा रखना पड़ता है।"

एक महत्त्वाची गोष्ट फक्त मूलांक ३ पाहून संपूर्ण व्यक्तिमत्त्व ठरवता येत नाही. तुमच्या पूर्ण जन्मतारखेत ३ हा अंक किती वेळा आला आहे, इतर कोणते अंक आहेत आणि त्यांची परस्पर रचना काय आहे—यावरही अंकांची अभिव्यक्ती बदलू शकते. म्हणूनच प्रत्येक मूलांक ३ व्यक्तीची कहाणी वेगळी असते.अंक फक्त संख्या नाही. प्रत्येक अंकामागे एक स्वभाव, एक संघर्ष आणि एक कहाणी असते.

तुमचा मूलांक ३ आहे का? विचार करा.



सीमा बक्षी
अकोला
मो. नं.
9834571153

# एकाच कंपनीच्या विद्युत साहित्यावर चोरट्यांचा डल्ला

## पातूर–भंडारज मार्गावर तीन वेळा चोरी

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**पातूर :** पातूर ते भंडारज मार्गावर विद्युत काम करणाऱ्या अशोका बिल्डकॉम कंपनीच्या साहित्याला चोरट्यांनी वारंवार लक्ष्य केल्याचा प्रकार समोर आला आहे. एकाच कंपनीच्या कामाच्या परिसरात तब्बल तीन वेळा तार चोरी झाल्याचे तक्रारींमधून समोर आले असून, या तीनही घटनांमध्ये मिळून तब्बल १० लाख ६२ हजार रुपयांचे विद्युत साहित्य चोरीला गेल्याचे सांगण्यात आले आहे.

अशोका बिल्डकॉम कंपनीच्या वतीने अभिषेक जगदेव पवार यांनी पातूर पोलिस ठाण्यात याबाबत तक्रारी दाखल केल्या आहेत. पातूर, भंडारज, शिर्ला आणि बाभूळगाव परिसरात कंपनीचे विद्युत काम सुरू असून, कामासाठी उभारण्यात आलेल्या विद्युत वाहिनीवरील तार चोरट्यांकडून लंपास करण्यात येत असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

### २८ जुलैला अडीच लाखांची तार चोरी

२८ जुलै २०२६ रोजी पातूर-भंडारज रोडवरील विद्युत कामाच्या ठिकाणी रात्री अंदाजे १२ ते पहाटे ५ वाजेदरम्यान चोरी झाली. या घटनेत १६ गाळे, सुमारे ३ किलोमीटर अंतरावरील आणि अंदाजे ५ क्विंटल वजनाची



तार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. या साहित्याची किंमत सुमारे २ लाख ५० हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

### वारंवार तार चोरीमुळे पातूर–भंडारज परिसरात खळबळ

एकाच कंपनीला तीन वेळा लक्ष्य करून लाखो रुपयांचे साहित्य लंपास झाल्याने पातूर–भंडारज मार्गावरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आता या सलग चोरीच्या घटनांचा छडा लावण्यात पोलिसांना यश येते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### १५ सप्टेंबरला पुन्हा मोठी चोरी; ६ लाख ७२ हजारांचे नुकसान

त्यानंतर १५ सप्टेंबर २०२६ रोजी याच परिसरात आणखी मोठी चोरी झाल्याचे समोर आले. बाभूळगावसमोरील तांदळी रोड ते भंडारज परिसरातील ३२ गाळ्यांवरील दोन इंची विद्युत तार चोरट्यांनी लंपास केली. या साहित्याची किंमत तब्बल ६ लाख ७२ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याच घटनेदरम्यान रात्रीच्या सुमारास संशयित चोरटे चारचाकी वाहनातून चोरीच्या ठिकाणी आल्याचे निदर्शनास आले. परिसरातील नागरिकांना संशय आल्याने चोरटे वाहनासह वेगाने पसार झाले. त्यामुळे वाहनाचा क्रमांक मिळू शकला नसल्याचे तक्रारीत नमूद आहे.

### तीन घटनांत १० लाख ६२ हजारांचा फटका

एकाच कंपनीच्या कामाच्या ठिकाणी तीन वेळा चोरी झाल्याने सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तिन्ही चोरीच्या घटनांमध्ये मिळून अंदाजे १० लाख ६२ हजार रुपयांचे विद्युत साहित्य चोरीला गेल्याचे संबंधितांकडून सांगण्यात आले आहे.

वारंवार होणाऱ्या या चोरीच्या घटनांमुळे कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, या चोरीच्या घटनांमध्ये एकच टोळी सक्रिय आहे का, चोरीचा माल कुठे विकला जात आहे आणि या घटनांमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा सखोल तपास करण्याची मागणी होत आहे.

पातूर पोलिसांनी या तिन्ही चोरीच्या घटनांचा एकत्रित तपास करून चोरट्यांचा शोध घ्यावा आणि चोरी गेलेले विद्युत साहित्य हस्तगत करावे, अशी मागणी कंपनीच्या वतीने करण्यात आली आहे.

# श्रीराम दरबार सुंदरकांड मंडळाकडून 'हनुमान अंश'

## चित्रपटाचा मोफत शो, 400 प्रेक्षकांचा प्रतिसाद

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अकोला :** श्रीराम दरबार सुंदरकांड मंडळाच्या वतीने ऋषिपंचमीनिमित्त 'हनुमानअंश' या चित्रपटाच्या दुसऱ्या मोफत प्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रयोगाला तब्बल ४०० नागरिक व युवकांनी उपस्थित राहून चित्रपट 'हाउसफुल' केला.

आध्यात्मिक भाव जागृत करणे, मनोरंजन आणि सामाजिक सहभागिता वाढवणे या उद्देशाने श्रीराम दरबार सुंदरकांड मंडळाकडून ऋषिपंचमीच्या शुभमुहूर्तावर 'हनुमानअंश' या चित्रपटाच्या मोफत प्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते. सनातन धर्म अधिक बळकट



करणे आणि सर्व घटकांना एकत्र आणणे हा यामागचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाला नागरिक आणि युवकांनी उदंड प्रतिसाद दिला असून तब्बल ४०० दर्शकांनी हजेरी लावल्यामुळे हा खेळ पूर्णपणे 'हाउसफुल' झाला. भविष्यातही अशाच प्रकारचे भव्य सामाजिक व सामुदायिक उपक्रम राबवण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीराम दरबार सुंदरकांड मंडळ, राजेश दिनोदिया, ऋषिकेश श्रीवास्तव, यश सावल, मनन शाह, गोविंद शर्मा, प्रेम तले, अंश शाह, मिहिर मलकान, अश्विन मिटकरी, जय मलकान, आदर्श ठाकुर, देवदत्त दिनोदिया, अभिषेक श्रीवास्तव, विशाल सुनारीवाल, महेश दिनोदिया यांच्यासह सर्व साथी मित्रमंडळींनी मोलाचे योगदान दिले. शेवटी सर्व सहयोगी आणि उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

# डॉ.जगन्नाथ ढोणे विद्यानिकेतन शाळेमध्ये चित्रकला स्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अडगाव बु. :** श्री. नवनिर्मित गणेशोत्सव मंडळ,बाजारपुऱ्याच्या वतीने 16 रोजी डॉ. जगन्नाथ ढोणे विद्यानिकेत येथे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .या स्पर्धे मध्ये वर्ग १ ते ४ च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

त्या मध्ये इयत्ता पहिलीतून वेदश्री नेमाडे इयत्ता दुसरीतून विभागून सुमित अढाऊ,अब्दुल उबेद अब्दुल वसीम तिसऱ्या वर्गातून पायल नेमाडे चौथी मधून श्रीमही गीऱ्हे या पाच विद्यार्थाना बक्षीस मिळाले. मंडळाच्या वतीने त्यांना बक्षीस देण्यात आले. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. आशा ढोकणे मॅडम,सौ.



किरण ताठे, सौ.दिपाली ताठे,सौ. कविता मोदे, प्राजक्ता वानखेडे,रुपाली निमकर्डे, मुकुंद वानखडे सर ऋषिकेश झनके सर यांची उपस्थिती होती.मंडळाचे अध्यक्ष विशाल देशमुख उपाध्यक्ष अनुप देशमुख,मंडळाचे सदस्य विठ्ठल चतुरकर,सुनील सोळंके,अविनाश नेवारे तेजस डाबेराव सचिन घायल सागर कोहरे ,आकाश कोल्हे यांनी परिश्रम घेतले.

# 'विद्यार्थी जीवनात मोबाईल महत्त्वाचा की पुस्तक?' न्यू इंग्लिश हायस्कूल मध्ये परिसंवाद



प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अकोला :** १५ सप्टेंबर रोजी स्थानिक न्यू इंग्लिश हायस्कूल येथे गणेशोत्सवाच्या निमित्ताने 'विद्यार्थी जीवनात मोबाईल महत्त्वाचा की पुस्तक?' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. सरस मांडणी केलेल्या विद्यार्थ्यांना प्राचार्य माधव मुंशी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक उदय हातवळणे, कोकीळ, तसेच पर्यवेक्षिका सौ. अलका बाजरे मॅडम होत्या. परिसंवादात इयत्ता पाचवी ते आठवीतील एकूण १२ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सहभागी विद्यार्थ्यांमध्ये आदित्य भोसले, अक्षरा खंडारे, भूमिका जुमळे, तमन्ना काजी, स्वराली वानखडे, कार्तिक चितोडे, आदर्श गवई, श्रुती भोसले, वैष्णवी मोरे, प्रांजल इंगोले, संस्कृती साबळे आणि आयुष सोनार यांचा समावेश होता.विद्यार्थ्यांनी मोबाईलचे शैक्षणिक उपयोग, त्याचे फायदे व मर्यादा तसेच पुस्तकांच्या वाचनामुळे होणारे ज्ञानवर्धन, विचारांची समृद्धी आणि व्यक्तिमत्त्व विकास यावर प्रभावीपणे आपले विचार मांडले.

या परिसंवादाचे परीक्षण सौ. सोनिया रोजतकर व गोपाल सांगूनवेडे यांनी केले. सौ. वैशाली धबाले व शशिकांत बांगर यांनी संचालन केले. परिसंवादामध्ये कु. वैष्णवी मोरे यांनी प्रथम क्रमांक, आदित्य भोसले यांनी द्वितीय क्रमांक, तर श्रुती भोसले यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.



हिवरखेड येथील गोवर्धनभाऊ गावंडे यांच्या निवासस्थानी गौरी महालक्ष्मीदेवीचे आगमन थाटात झाले.

# दत्तात्रय अर्बन ॲड. दिपाली जानोरकर यांचा सत्कार

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अकोला :** दत्तात्रय अर्बन मल्टीस्टेट को. ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची 32 वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली. या सभेत गुणवंत विद्यार्थी, दीर्घ मुदतीचे ठेवीदार, तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

पाटील समाज महिला मंडळाच्या सचिव ऍड. दिपाली जानोरकर यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. ऍड. दिपाली यांनी " कौटुंबिक वादविवाद समेट केंद्र " तयार केले असून अनेकांना त्यांनी मोफत कायदेशीर सल्ला देऊन त्यांचे वाद मिटविले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांचा हा



गौरव करण्यात आला. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जगदीश मुरूमकार होते. सभेला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार किरण सरनाईक, माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, बेरार एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ऍड. मोतीसिंह मोहता, अकोला अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष रामेश्वर फुंडकर, सुमित्राबाई कृषी महाविद्यालयाचे अध्यक्ष कृष्णा अंधारे, नगरसेवक आशिष पवित्रकार, जिल्हा परिषदेचे माजी सभापती चंद्रशेखर पांडे उपस्थित होते. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवशंकर नळकांडे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. त्यास सर्वांनुमते मंजुरी देण्यात आली. तसेच 2025... 26 या आर्थिक वर्षातील कामकाजाचा आढावा, वार्षिक अहवाल, आगामी नियोजनाची माहिती सभासदांना देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत पिंजरकर यांनी तर आभार प्रदर्शन लक्ष्मीकांत फाटे यांनी केले. सभेच्या व कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता जगदीश मुरुमकर यांचे सह संचालक मंडळाने परिश्रम घेतले.

# अकोटमध्ये मतदार नोंदणीसाठी विशेष शिबिरे

वि. प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अकोट :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर-२०२६) कार्यक्रमांतर्गत २८-अकोट विधानसभा मतदारसंघात १९, २०, २६ व २७ सप्टेंबर रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

ही शिबिरे सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्व मतदान केंद्रांवर होणार आहेत.

मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, नाव अथवा पत्त्यातील दुरुस्ती तसेच इतर बदलांसाठी नमुना अर्ज क्रमांक ६, ७ व ८ स्वीकारले जाणार आहेत. ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारल्या जात असून, नागरिकांना संबंधित बीएलओकडे किंवा ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहेत. १ ऑक्टोबर २०२६ रोजी १८ वर्षे पूर्ण करणारे युवक-युवती, महिला, दिव्यांग तसेच अद्याप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन निवडणूक प्रशासनाने केले आहे.

**आपले नाव मतदार यादीत आहे का?**

नाव नसल्यास त्वरित नोंदणी करा, दुरुस्ती आवश्यक असल्यास अर्ज सादर करा आणि कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांची नावे मतदार यादीत असल्याची खात्री करा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे श्री संत गजानन महाराज पुण्यतिथी उत्सव संपन्न

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अकोट :** आकोट अनंतकोटी ब्रम्हांडनायक शेगावनिवासी समर्थ सद्गुरु श्री संत गजानन महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव भाद्रपद शुद्ध पंचमी - ऋषिपंचमीला श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे संपन्न झाला. श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर, आकोट द्वारा प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रींच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त एकदिवसीय नामसंकीर्तन उत्सव आयोजित करण्यात आला होता. १४ सप्टेंबर रोजी पहाटे सद्गुरु श्री संत वासुदेव महाराज यांच्या मंदिरामध्ये अभिषेक होऊन पुरुषोत्तम लाजुरकर यांच्या



शुभहस्ते तीर्थस्थापना करण्यात आली. याप्रसंगी वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी विधिवत मंत्रघोष व सांप्रदायिक भजन केले. दुपारच्या सत्रामध्ये श्री.ह.भ.प. उमेश महाराज मोहोकार यांची ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा व रात्रीच्या सत्रात श्री.ह.भ.प. ज्ञानेशप्रसाद महाराज पाटील यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. १५ सप्टेंबर रोजी पहाटे काकडा आरती व श्रींचा अभिषेक संपन्न झाला. त्यानंतर अध्यक्ष वासुदेवराव महाराज महल्ले यांचे काल्याचे कीर्तन संपन्न झाले. यानंतर श्री संस्थेचे निमंत्रित सदस्य वै. सदाशिवराव पोटे यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिपक पोटे यांचे कडून सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाकरिता श्री संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे महादेवराव ठाकरे, पुरुषोत्तम लाजुरकर, अविनाश गावंडे, अशोकराव पाचडे, मध्यस्थी वधू वर सूचक मंडळाचे सुरेश कराळे, नागोराव कुलट, नंदकिशोर जांभुळकर वारकरी शिक्षण संस्थेचे अंबादास महाराज मानकर, राम महाराज गाढे, व्यवस्थापक अमोल मानकर, दिलीप कुलट, बाळकृष्ण वाकोडे, आदींसह संस्थेचे विद्यार्थी व भाविक भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# खा. अनुप धोत्रे यांचा नगर परिषदेत सत्कार

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**मुर्तीजापूर :** मुर्तीजापूर नगर परिषदेत गुरुवारी खासदार अनुप धोत्रे यांचा स्वागत-सत्कार करण्यात आला. यावेळी प्रभागातील प्रलंबित विकासकामे तसेच नागरिकांच्या विविध समस्या याबाबत खासदार धोत्रे यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने माजी नगरसेवक अब्दुल रफीक कुरेशी व नगरसेवक अब्दुल बाकी यांनी प्रभागातील आवश्यक विकासकामांची माहिती खासदारांसमोर मांडली. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या या कामांना गती मिळावी, यासाठी आवश्यक सहकार्य करण्याची विनंती त्यांनी



केली.

यावेळी खासदार अनुप धोत्रे यांनी प्रभागातील विकासकामांबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त करीत आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामे मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# सावरा विकास बोदडेच्या आर्मी सैनिकाने शालेय साहित्य विद्यार्थ्यांना वाटून केला आदर्श निर्माण

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अकोट :** तालुक्यातील सावरा,मंचनपूर व उर्दू शाळेमधील विद्यार्थ्यांना भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले विकास सखाराम बोदडे यांनी आपला वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला असून त्यामुळे समाजात विद्यार्थी मदतीचा हात सकारात्मक संदेश निर्माण झाला आहे या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरावर आनंद व्यक्त होत आहे.

सावरा जि.प.शाळेमध्ये आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार वैभव गुजरकार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विकास बोदडे, तंटामुक्ती उपाध्यक्ष विकी धांडे,वंचितचे भाऊराव धांडे,कवठा येथील पत्रकार राजेश साविकार,तसेच मंचनपूर येथील निलेश वानखडे , पत्रकार योगपाल लबडे ,रामविजय जवंजाळ मुख्याध्यापिका छाया चौधरी मंचनपूर येथील मुख्याध्यापक, कळंबे, खडसे तसेच उर्दू शाळेचे मुख्याध्यापक मुस्ताक शेख आणि शिक्षक नजर खान इत्यादींची उपस्थिती लाभली होती.यावेळी बोदडे यांचा शाळेचे वतिने सामुहिक स्वागत सत्कार करण्यात आला तद्नंतर विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे अनुक्रमे वाटप करण्यात आले.

# पणजचे ग्राम दैवत; हाकेला धावून येणारी माहेर वाशीनी महालक्ष्मी माता



पवन बेलसरे १८ सप्टेंबर

**अकोट :** पणज गावाने कबड्डी खेळासह व केळी उत्पादनासाठी विदर्भात ओळख निर्माण केली आहे. येथील प्राचीन गौरी महालक्ष्मी मंदिराचा महोत्सव देखील वाखाणण्याजोगा आहे. मंदिरालगत शहापूर वाघोडा प्रकल्प असल्याने निसर्गरम्य वातावरण तयार झाले आहे मोठी सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे, यासह गावात तीनशे वर्ष जुने गौरी महालक्ष्मी मातेचे जागृत मंदिर असल्याने गावाला आध्यात्मिक व पौराणिक वारसा सुद्धा प्राप्त झाला आहे येथील महालक्ष्मी मातेच्या पुरातन मंदिर संदर्भात एक आख्यायिका आहे त्यानुसार पुरातन काळी पणज पासून जवळ असलेल्या महागाव मधील दोन सासुरवाशीनी बहिणी व आपल्या चिमुकल्या लहान भावाला बैलगाडीत घेऊन वडाळी देशमुख गावाकडे निघाल्या होत्या शेतकऱ्याने त्यांना बसायला विनवणी केली त्यावेळी त्यांनी बसतो पण तुम्ही

## 300 वर्ष जुने, पाय विहीर, दीपमाळा व महालक्ष्मी मातेचे मंदिर



गाव येईपर्यंत मागे वळून पाहायचे नाही असा पण केला होता, मात्र गावाजवळील वाहत्या बोर्डी नदीच्या तीराजवळआल्यानंतर बैलगाडी वाल्याने मागे वळून पाहिले त्याच क्षणी दोन्ही सासरवासी बहिणी व भाऊ मूर्तीत रूपांतरित झाल्या व सासरवासीनी पणज गावातच कायमच्या माहेरवाशीने झाल्या असे भाविक भक्ताकडून सांगितले जाते तेव्हापासून पणज गावात ज्येष्ठ गौरीपूजनाच्या दिवशी सतत तीन दिवस भाविक महालक्ष्मी मातेच्या दर्शनासाठी येतात यासह मंगळवार व शुक्रवार सुद्धा भाविक श्रद्धेने मंदिरात येऊन तेथे पूजा अर्चना करतात वा धार्मिक स्थळावर गावातील तसेच परिसरातील<भाविक भक्त व मंदिर यात्रा समिती महाप्रसादाचे आयोजन करते या प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार गावकऱ्यांना कडून व पंचक्रोशीतील भाविकांकडून १८८० करण्यात आला मंदिरात माता महालक्ष्मीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा १८८५ साली करण्यात आली लाखो नागरिकांचे श्रद्धास्थान असल्यामुळे भाविक आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्रातून दूरवरून येथे दाखल होतात. पणज गावातील मंदिर महालक्ष्मी मातेचे माहेर असल्याने देशातील एकमेव मंदिर असल्याचा दावा भक्तगण करतात त्यामुळे परिसरात येणारे या अनेक गावांमधील माहेरी येणारी प्रत्येक सासरवासिनी या मंदिरात आवर्जून दर्शनाला येते गौरी पूजनाच्या तीन दिवस गावामध्ये दिवाळी साजरी करण्यात येते. तसेच नवरात्राचे नऊ दिवस मंगळवारी भक्तांच्या रांगा व अलोट गर्दीचा भावभक्त गजर असतो. गावातील प्राचीन मंदिर परिसरात दीपमाळा असून त्याखाली पाय विहीर आहे पाय विहिरी मधून यात्रेत भंडारा करायला भांडीकुंडी आपोआप प्राप्त व्हायची व भंडारा संपल्यानंतर आपोआप विसर्जित व्हायची पाय विहिरीतील खालच्या पायरीला मोठा साकळदंड असून खालच्या पायरीवरून भाविका आणायचे असे भाविक सांगतात,

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## प्रा. संतोष जाधव यांना पीएच.डी.



प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**उमरखेड** : मनुला (बु.), ता. हदगाव येथील सुपुत्र तथा खरे-ढेरे-भोसले महाविद्यालय, गुहागर येथील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. संतोष जाधव यांनी सूक्ष्मजीवशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी ही पदवी प्रदान केली.

त्यांचा संशोधन प्रबंध "उच्च उत्पादन देणाऱ्या भाताच्या वाणांतील अंतर्गत सूक्ष्मजीवांच्या वाढीस प्रोत्साहन देणाऱ्या गुणधर्मांचे आण्विक व आनुवंशिक अभ्यासाबाबत अभ्यास" या विषयावर आधारित आहे. उच्च उत्पादन देणाऱ्या भाताच्या वाणांतील उपयुक्त सूक्ष्मजीवांचा सखोल अभ्यास यात करण्यात आला आहे. कृषी क्षेत्रासाठी हे संशोधन महत्त्वाचे मानले जाते. १८ ऑगस्ट २०२६ रोजी ऑनलाइन पद्धतीने पार पडलेल्या मौखिक परीक्षेत प्रा. डॉ. ए. पी. पाठक यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत होती. बाह्य परीक्षक डॉ. आर. एन. भार्गव तर संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. डी. सी. कमठाणे होते. प्रा. जाधव हे वरखेड येथील ऋषी गावंडे महाविद्यालयाचे विद्यार्थी असून गेल्या १३ वर्षांपासून अध्यापन करतात.

# बोगस डॉक्टरांवर कारवाईचा बडगा

### माहिती देणाऱ्यांचे नाव राहिल गुप्त; पंचायत समिती बाभूळगावच्या बैठकीत निर्णय



प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**बाभूळगाव** : ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अनधिकृत व बोगस डॉक्टरांविरुद्ध मोहीम तीव्र करण्याचा निर्णय पंचायत समिती बाभूळगावने घेतला आहे. आज येथे गट विकास अधिकारी उज्वला ढोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष बैठकीत यासंदर्भात चर्चा होऊन कठोर कारवाईचा निर्धार करण्यात आला.

बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. या अनधिकृत व्यवसायाला पूर्णविराम देण्यासाठी प्रशासनाने जनतेला सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांना महत्त्वाचे आवाहन गावात किंवा परिसरात विनापरवाना, वैध वैद्यकीय पदवी नसताना किंवा बोगस पद्धतीने प्रॅक्टिस करणारे डॉक्टर आढळल्यास त्याची माहिती तातडीने पंचायत समिती बाभूळगावच्या आरोग्य विभागाकडे किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रात द्यावी. सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील किंवा तलाठी यांच्यामार्फतही माहिती कळविता येईल. माहिती देणाऱ्या नागरिकाचे नाव, पत्ता आणि ओळख पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. उपचार घेण्यापूर्वी संबंधित डॉक्टरांकडे शासनमान्य पदवी (एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस) आणि कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आहे किंवा नाही, याची खात्री करण्याचे आवाहनही करण्यात आले.

कोणतीही पदवी नसताना ॲलोपॅथी औषधे व इंजेक्शन देणे किंवा चुकीच्या पद्धतीने उपचार करून फसवणूक करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध तक्रार करावी, असे स्पष्ट करण्यात आले. गट विकास अधिकारी उज्वला ढोले यांनी नागरिकांना स्वतःच्या आणि कुटुंबाच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी सजग राहण्याचे आवाहन केले. बोगस डॉक्टरांना आळा घालण्यासाठी प्रशासनाचे हात बळकट करावे, असे त्या म्हणाल्या. या बैठकीस सहायक गट विकास अधिकारी हेमंत निवल, तालुका आरोग्य अधिकारी तथा बोगस डॉक्टर समिती सचिव डॉ. संघर्ष राठोड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. लीना मुसळे, नगरपंचायत मुख्याधिकारी डॉ. पल्लवी सोटे, आरोग्य विस्तार अधिकारी प्रशांत पाटील व सचिन पाढरमिसे, आरोग्य निरीक्षक योगेश पाटील यांच्यासह इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कार्यशाळा



प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**कळंब** : उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालय कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ तसेच सुधारित नियम २०१२ ची प्रभावी अंमलबजावणी आणि सामूहिक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखड्यांची अंमलबजावणी याबाबत प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

१७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता तहसील कार्यालय कळंब येथील सभागृहात ही कार्यशाळा पार पडली. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पांढरकवडा तसेच तालुकास्तरीय कन्व्हर्जन्स समिती, कळंब यांच्या सौजन्याने आयोजित कार्यशाळेला कळंब तालुक्यातील विविध गावांतील वनहक्क समित्यांचे अध्यक्ष, सदस्य, सरपंच व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार सौ. माला गेडाम होत्या. पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी डॉ. गंगमवार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेदरम्यान वनहक्क व्यवस्थापन जिल्हा कार्यालयाचे रुपेश शृपवार तसेच कळंब तालुका व्यवस्थापन समितीचे अनूप जामोतकर यांनी उपस्थित वनहक्क समिती अध्यक्ष, सरपंच व सदस्यांना वनहक्क कायदा, सामूहिक वनहक्क, वनसंपत्तीचे संवर्धन व व्यवस्थापन तसेच व्यवस्थापन आराखडा तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले. उपस्थित समिती अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी वनहक्क अंमलबजावणीसंदर्भातील विविध अडचणी व समस्या मांडल्या. संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या समस्या जाणून घेत आवश्यक मार्गदर्शन केले.

## मंजुरी रखडली, उपचार थांबले

**यवतमाळ** : हृदयाची कार्यक्षमता ३० टक्क्यांवर आल्याने सीआरटीडी उपकरण बसविण्याची गरज असलेल्या अमरावतीच्या ७२ वर्षीय पुरुषोत्तम तोक्षिया यांच्या उपचाराला अखेर आयुष्मान योजनेतून मंजुरी मिळाली. खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या पाठपुराव्यानंतर पाच लाख रुपयांची मदत मंजूर झाली. यवतमाळच्या दत्त हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया यशस्वी झाली. कुटुंबीय पात्र असतानाही मंजुरी रखडल्याने १२ दिवसांनंतर रुग्णाला घरी नेण्यात आले.

# समान कामासाठी समान वेतनाची मागणी

### न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा काळी फितीने निषेध



प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**यवतमाळ** : समान काम समान वेतनासह विविध प्रलंबित मागण्यांकडे शासन व उच्च न्यायालयाचे लक्ष वेधण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी मंगळवारी काळी फित लावून शांततामय निषेध नोंदविला. १६ ऑगस्ट २०२६ रोजी देण्यात आलेल्या इशारा वजा संपाच्या नोटिशीनुसार हे आंदोलन करण्यात आले.

न्यायालयीन कर्मचारी अनेक वर्षांपासून कर्तव्य बजावत असतानाही समान काम समान वेतनाच्या मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला. विविध मागण्यांसाठी निवेदने, पाठपुरावा तसेच आंदोलने करूनही ठोस निर्णय झालेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे सांगण्यात आले. काळी फित लावून निषेध करताना कर्मचाऱ्यांनी न्यायालयीन कामकाजावर कोणताही परिणाम होऊ दिला नाही. कर्तव्य बजावत शांततेच्या मार्गाने आंदोलन करून शासन आणि उच्च न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले. समान काम समान वेतन ही मागणी आर्थिक लाभापुरती मर्यादित नसून समानता आणि हक्काशी संबंधित असल्याने शासनाने त्यावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. मागण्यांची दखल न घेतल्यास आगामी काळात आंदोलनाची तीव्रता वाढविण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला. यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यांतील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळी फित लावून आंदोलनात सहभाग घेतला. त्यामुळे निषेध आंदोलनाला व्यापक प्रतिसाद मिळाल्याचा दावा कर्मचारी संघटनेने केला.

# सहयोग ग्रुपकडून नवनियुक्त शिक्षकांचा सत्कार



प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**झरी जामणी** : सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये सातत्याने योगदान देणाऱ्या सहयोग ग्रुप, मुकुटबनच्या वतीने परिसरातील नवनियुक्त शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांमध्ये नुकतेच नियुक्त झालेल्या शिक्षकांचा यावेळी गौरव करण्यात आला.

यामध्ये मुकुटबन येथील मनिषा तिपर्तीवार, लिंगटी येथील आशिक शेख, कोसारा येथील समीर गांवडे तसेच रोशन भोयर यांचा सत्कार करण्यात आला. नवनियुक्त शिक्षकांनी आपल्या संघर्षमय प्रवासाबद्दल मनोगत व्यक्त केले. उपस्थितांना सुरेंद्र गेडाम व गणेश बुट्टे यांनी मार्गदर्शन केले. सहयोग ग्रुपकडून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन, परीक्षेसाठी आवश्यक मदत तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार नियमितपणे केला जातो. या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाला सहयोग ग्रुप व निसर्ग पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र गेडाम, विपीन वडके, केतन ठाकरे, वामण बाडलवार, लोकनाथ खडसे, विलास देवढगले, सुधाकर नरांजे, नितेश भालेराव, संदीप धोटे, प्रेमानंद ऐलमावार, निलेश भोयर, अनिल चव्हाण, राहुल ठाकरे, सुधाकर गांवडे, पवन साबळे, माधव चाटे, वसंता उदकवार, प्रशांत भगत, संदीप पोटरकर, चंद्रशेखर चौधरी, चितेंश्वर वैद्य, माधव उदार, विपीन वासाड, रमेश वैद्य, किशोर भोयर, प्रफुल्ल कडू तसेच आरसीसीपीएलचे महेंद्र ठेंबरे यांच्यासह सहयोग ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. गजानन गद्दलवार यांनी केले, तर आभार पंकज जाधव यांनी केले.

## बाबा कंबलपोष उर्दू हायस्कूलमध्ये 'पोषण सप्ताह'



प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**आर्णी** : बाबा कंबलपोष उर्दू हायस्कूल येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत 'पोषण सप्ताह'निमित्त विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये संतुलित आहार, स्वच्छ आहार पद्धती आणि निरोगी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका फिरदौस शाहीन सय्यद होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. निलोफर खान व डॉ. फैजान खान उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते रिबन कापून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. मार्गदर्शन करताना डॉ. निलोफर खान आणि डॉ. फैजान खान यांनी विद्यार्थ्यांना संतुलित आहाराचे महत्त्व पटवून दिले. शारीरिक व मानसिक विकासासाठी ताजे फळे, हिरव्या पालेभाज्या, दूध आणि स्वच्छ पाण्याचे नियमित सेवन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जंक फूडपासून दूर राहून नियमित व्यायाम करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे पौष्टिक व हेल्दी फूड तयार करून सादर केले. मान्यवरांनी या पदार्थांचे निरीक्षण करून उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरव केला. "निरोगी रहा, संतुलित आहार घ्या आणि चांगल्या सवयी अंगीकारा" हा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आला. यावेळी खालिद शेख, तलत खान, फौजिया आफरीन, सय्यद नौशाद अली, अजीज चौव्हाण, मुजीब शेख, सोहेल खान यांच्यासह शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोपनल भगत यांना आचार्य पदवी

### बेंबळा पुनर्वसित गावांच्या प्रश्नांवर संशोधन

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**बाभुळगाव** : लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयातील समाजशास्त्र विषयाच्या संशोधक विद्यार्थिनी सोपनल राजेंद्र भगत यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने आचार्य पदवी बहाल केली. त्यांनी 'यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा धरणाच्या पुनर्वसित गावातील लोकांवर झालेल्या सामाजिक व आर्थिक परिणामांचे समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयावर संशोधन केले.



प्रा. डॉ. सुधा मुरलीधर खडके यांच्या मार्गदर्शनाखाली सोपनल भगत यांनी बाभूळगाव तालुक्यातील बारा पुनर्वसित गावांचे सर्वेक्षण केले. धरणामुळे पुनर्वसित झालेल्या कुटुंबांवर झालेल्या सामाजिक व आर्थिक परिणामांचा अभ्यास करून त्यांच्या विविध प्रश्नांवर संशोधनातून प्रकाश टाकण्यात आला. तसेच संशोधनातील निष्कर्षांच्या आधारे पुनर्वसित गावांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी शिफारशी मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला. आचार्य पदवीच्या मौखिक परीक्षेसाठी बाह्य परीक्षक म्हणून एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाच्या माजी प्राचार्य डॉ. स्मृती भोसले उपस्थित होत्या. समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.एच. किर्दक आणि विषयतज्ज्ञ डॉ. अरुण चव्हाण यांचीही उपस्थिती होती. संशोधन पूर्ण करण्यासाठी रिसर्च सेंटरचे प्रमुख प्राचार्य डॉ. दुर्गेश कुंटे, प्रा. डॉ. कविता तातेड यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल डॉ. सोपनल भगत यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## मोख येथील उपोषण संपले; चौकशी समिती गठीत



प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**दिग्रस** : ग्रामीण भागाचा विकास व्हावा या दृष्टिकोनातून राज्य व केंद्र सरकार विशेष लक्ष देत आहे. ग्राम पातळीवरील समस्या जाणून तेथे विकास कामे करण्यासाठी भरघोस निधीही देत आहे. यासाठी ग्रामपंचायतींना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. परंतु ग्रामपंचायतीकडे आलेला निधी योग्य कामांवर खर्च न करता अनावश्यक कामांमध्ये वापरण्याचे प्रकार प्रमाणात होत आहेत.

हीच बाब हेरून तालुक्यातील मोख क्रमांक दोन येथेही ग्रामपंचायतच्या व्यवहारांत असाच लहरीपणा दिसून आल्याने गावातील निखिल राठोड आणि मांगीलाल चव्हाण या दोन युवकांनी मागील पाच वर्षांत गावात झालेल्या कामकाजाचा लेखाजोखा व इतर कामांबाबत सविस्तर माहिती मिळण्यासाठी उपोषण सुरू केले होते. त्याला यश आले आहे. मोख क्रमांक दोन येथील मागील पाच वर्षांच्या विविध विकास कामांच्या मागणीसाठी निखिल राठोड आणि मांगीलाल चव्हाण यांनी ११ सप्टेंबरपासून उपोषणाला सुरुवात केली होती. त्यापूर्वी त्यांनी अधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार करून ही माहिती मागितली होती. परंतु टाळाटाळ उत्तर मिळाल्याने अखेर या दोन युवकांनी उपोषण सुरू केले. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेत खळबळ उडाली होती. मोख क्रमांक दोन येथील उपोषण मंडपाला खा. संजय देशमुख यांनी भेट देऊन मागणी जाणून घेतली आणि वरिष्ठांकडे पत्र देऊन तात्काळ चौकशी समितीच्या माध्यमातून सविस्तर तपासणी अहवाल देण्याच्या सूचना केल्या होत्या. शिवाय भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राठोड व भाजपा सदस्यांनी जाऊन चर्चा केली आणि संबंधित अधिकाऱ्यांशी बोलून आंदोलन सोडवण्याचे सांगितले होते. त्यानंतर प्रशासकीय हालचालींना गती मिळाली आणि अखेर चौकशी समितीचे गठन करण्यात आले. ही समिती २४ सप्टेंबरपासून तपासणी करणार आहे. याबाबत प्रशासनाच्या वतीने पंचायत समिती दिग्रसचे विस्तार अधिकारी जतकर यांनी सदर पत्र तेथे जाऊन ग्रामस्थांच्या समोर वाचून दाखवले. यानंतर भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राठोड, रमेश करवा, नामदेव जाधव, कैलास राठोड, राम पवार, संजय घरत आणि भाजपाच्या इतर सदस्यांनी उपोषणावर बसलेल्या युवकांना लिंबू शरबत देऊन उपोषणाची सांगता केली.

# हर्ष ठाकूर यांच्यावरील गुन्हा मागे घ्या

### सकल हिंदू समाजाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**उमरखेड** : सिद्धेश्वर मित्र मंडळाच्या दहीहंडी कार्यक्रमातील कथित भाषणावरून हर्ष ठाकूर यांच्याविरुद्ध दाखल झालेल्या गुन्ह्याबाबत सकल हिंदू समाजाने आक्रमक भूमिका घेतली आहे. गुन्ह्याची निष्पक्ष चौकशी करून आरोप सिद्ध न झाल्यास तो मागे घेण्याची मागणी करणारे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांच्यामार्फत सादर करण्यात आले.

पोलीस स्टेशन उमरखेड येथे भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १९६(१), २९९ व ३५३(२) अन्वये गुन्हा क्र. ८९५/२०२६ दाखल झाला आहे. निवेदनात म्हटले आहे की, १२ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या कार्यक्रमाला हर्ष ठाकूर प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी हिंदू धर्मासंदर्भात विचार मांडले असून मुस्लिम समाजाच्या भावना भडकावणारे भाषण केले नसल्याचा दावा करण्यात आला आहे. "भाषण प्रत्यक्ष ऐकले नसताना तक्रार कशी?" असा सवाल निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. कथित वक्तव्याचा संपूर्ण संदर्भ, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि उपलब्ध व्हिडिओ पुराव्यांची वस्तुनिष्ठ तपासणी होणे आवश्यक असल्याचे निवेदनकर्त्यांनी अधोरेखित केले आहे. स्थानिक राजकीय दबावातून गुन्हा दाखल झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सकल हिंदू समाजाने तपासात आरोप तथ्यहीन आढळल्यास तक्रारदारांवरही कारवाई करण्याची मागणी केली आहे. निवेदन देते वेळी भाजप जिल्हाध्यक्ष आरती फुपाटे, माजी आमदार उत्तमराव इंगळे, शिवसेना शिंदे गटाचे शहराध्यक्ष ॲड. संजयकुमार जाधव, भाजप शहराध्यक्ष अतुल खंदारे, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष दामोदर इंगोले तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आता प्रशासन या प्रकरणाची स्वतंत्र पडताळणी करून कायदेशीर निर्णय काय घेते, याकडे उमरखेडकरांचे लक्ष लागले आहे.

# पुसद अभियंता दिनात जपली सामाजिक बांधिलकी

### रेनवॉटर हार्वेस्टिंगपासून ज्येष्ठांच्या सन्मानापर्यंत विविध उपक्रम

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**पुसद** : विश्वेश्वरया इंजिनिअर्स अँड आर्किटेक्ट असोसिएशन, पुसदतर्फे अभियंता दिन मोठ्या उत्साहात व अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. गणोबा मंगल कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार ॲड. निलय नाईक होते. प्रमुख पाहुणे म्हणून डीवायएसपी अमर मोहिते, कार्यकारी अभियंता महेश माथुरकर तसेच असोसिएशनचे अध्यक्ष सय्यद अन्वर अली व सचिव गजानन देशमुख उपस्थित होते.

दीपप्रज्वलन व भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरया यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. असोसिएशन गेल्या १२ वर्षांपासून अभियंता दिनानिमित्त विविध सामाजिक व समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे. यावर्षी रेनवॉटर हार्वेस्टिंग जनजागृती अभियान, मोफत आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान, ज्येष्ठ निवृत्त कंत्राटदारांचा सत्कार, अभियंता क्षेत्रातून निवडून आलेल्या नगरसेवकांचा सन्मान, गुणवंत अभियंत्यांच्या पाल्यांचा सत्कार आदी उपक्रमांची भर घालण्यात आली. पाणी बचतीसाठी रेनवॉटर हार्वेस्टिंगबाबत जनजागृती व्हिडिओ शहरात फिरविण्यात आला. नागरिकांना मोफत मार्गदर्शन मिळेल, असे अध्यक्ष सय्यद अन्वर अली यांनी सांगितले. गुणवंत अभियंत्यांच्या पाल्यांमध्ये कु. सिया वैभव बजाज, आयुष योगेश पांडे, सार्थक राजेश पालिकोंडावार व स्वानंद स्वप्नील चिंतामणी यांचा सत्कार करण्यात आला. अभियंता क्षेत्रातून नगरसेवक झालेल्या अभि. सुरेंद्र कोडगीरवार, मझहर खान ताहेर खान व ऐश्वर्या



बोरकर यांचाही सन्मान करण्यात आला. ज्येष्ठ निवृत्त कंत्राटदार मदनजी जांगिड, हाजी बशारत अली, ऐनुद्दीन खतीब, विजयराव खडकेकर, हनुमान बजाज, आनंदराव राठोड, जे.पी. पाटील, माधव पालिकोंडावार, मालपाणी, प्रदीप देशपांडे, सय्यद जमीर व अ. मजीद यांचा शाल-श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. डीवायएसपी अमर मोहिते म्हणाले, "मी स्वतः अभियंता असून हा कार्यक्रम भव्य पद्धतीने साजरा होताना आनंद होत आहे. असोसिएशन समाजाला सकारात्मक संदेश देत आहे." कार्यकारी अभियंता महेश माथुरकर यांनी अभियंते व कंत्राटदार यांच्यातील समन्वयावर भर दिला. अध्यक्षीय मनोगतात ॲड. निलय नाईक यांनी ज्येष्ठ कंत्राटदारांच्या योगदानाला विशेष सलाम केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरगुलवार व राजेश पालिकोंडावार यांनी केले, तर आभार प्रदर्शन गजानन देशमुख यांनी केले. असोसिएशनचे सदस्य, कंत्राटदार व विद्यार्थी उपस्थित होते.

# MPSC परीक्षा CBT पद्धतीने नकोच; -विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ थांबवा

## व्ही. राधा समितीकडे अमरावती युवक काँग्रेसचे आक्रमक निवेदन

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अमरावती :** स्पर्धा परीक्षांच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी होणारा खेळ तातडीने थांबवावा, अशी आक्रमक मागणी अमरावती शहर युवक काँग्रेसने केली आहे.

विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांबाबत व्ही. राधा समितीच्या अध्यक्षा यांच्याकडे निवेदन सादर करून MPSC परीक्षा पद्धतीसह परीक्षा प्रक्रियेतील त्रुटींवर लक्ष वेधण्यात आले.

दि. 21 फेब्रुवारी 2024 रोजी अमरावतीतील मृदा व जलसंधारण विभागाच्या ऑनलाइन परीक्षेत परीक्षा हॉलमध्येच काही विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका देण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला होता. या प्रकारानंतर परीक्षा रद्द करण्यात आली. अशा घटनांमुळे परीक्षा यंत्रणेच्या पारदर्शकतेवर आणि विद्यार्थ्यांच्या विश्वासावर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे युवक काँग्रेसने म्हटले.



MPSCच्या परीक्षा CBT पद्धतीऐवजी ऑफलाइन OMR पद्धतीनेच घेण्यात याव्यात, तसेच परीक्षांचे Objective स्वरूप कायम ठेवून Descrip-tive पद्धत लागू करू नये, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून निकाल जाहीर होईपर्यंत संपूर्ण परीक्षा प्रक्रियेत कडक सुरक्षा व्यवस्था, CCTV देखरेख, प्रवेश नियंत्रण आणि परीक्षा कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणीही करण्यात आली. परीक्षा पद्धतीत वारंवार बदल करून विद्यार्थ्यांना संभ्रमात न टाकता कोणताही मोठा निर्णय घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांशी संवाद साधावा, अशी मागणी युवक काँग्रेसने केली.

"विद्यार्थी वर्षानुवर्षे मेहनत करतात; परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकार आणि प्रशासकीय त्रुटींची शिक्षा विद्यार्थ्यांना मिळता कामा नये," अशी भूमिका मांडत समितीने विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा आपल्या अहवालात समावेश करून शासनाकडे ठोस शिफारशी कराव्यात, अशी मागणी अमरावती युवक काँग्रेसने केली.

यावेळी माजी प्रदेश सचिव समीर जवंजाळ, अमरावती विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख, जिल्हा ग्रामीण उपाध्यक्ष अक्षय साबळे, बडनेरा विधानसभा अध्यक्ष आशिष यादव, धनंजय बोबडे, प्रियाल मोहोड, आकाश गेडाम या युवक कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांसह सिनेट सदस्य कैलास चव्हाण, कुलदीप विधळे, भूपेंद्र राजपूत, विक्की तायडे, विवेक मोहोड, सौरभ नाकट हे विद्यार्थी प्रतिनिधी सुद्धा उपस्थित होते.

# अवैधरित्या चालणाऱ्या हातभट्टीवर धडक कार्यवाही

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अमरावती :** गुन्हे शाखा युनिट-२ अमरावती शहर कडुन अवैध्यरित्या रनिंग गावठी दारू हातभटटीवर धडक कर्यावाही करण्यात आली. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी गुन्हे शाखेतील पथकाची विशेष बैठक घेवुन शहरात अवैध्यरित्या गावठी भटटीची दारू निर्मीती व विक्री करण्या-या इसमांवर प्रभावी मोहिम राबवीण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार अतुल वर, पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे नेतृत्वात पथकाने खालील प्रमाणे कारवाई केली.



गुन्हे शाखा अमरावती शहर यांना गुप्त माहीती मिळाली की, मनोज बेनिवाल रा. परीहारपुरा, वडाळी हा त्याचे राहते घराच्या आवारात मध्ये अवैध्यरित्या रनिंग गावठी हातभटटीची दारू काढत आहे, अशा मिळालेल्या माहीती वरूण गुन्हे शाखेचे पथक नमुद ठिकाणी रेड कार्यवाही करीता गेले असता एक इसम हा गावठी भटटीवर एका प्लाटीक नळी व्दारे गावठी दारू काढतांना दिसुन आल्याने नमुद इसमांस ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन गावठी हातभटटी दारू, मोहमाच सळवा व गावटी भटटी करीता लागणारे इतर साहीत्य जप्त करूण नमुद इसमा विरूध्द पोलीस स्टेशन फेजरपुरा येथे कलम ६५ (क), (फ), (ड) महाराष्ट्र दारूबंदी कायदया अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव मनोज मोहन बेनिवाल, वय ५२ रा. परिहारपुरा, वडाळी, अमरावती असे आहे.

गावठी हातभटटी दारू ७५ लिटर, मोहमाच सळवा १५० लिटर व इतर साहीत्य असा एकुण कि.अ ७५,७५०/- रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला. सदर ची कारवाई . पोलीस आयुक्त राकेश ओला, यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त परिमंडळ १ यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त परिमंडळ २ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय (गुन्हे) प्रांजली सोनवणे, सपोआ गुन्हे शाखा निलेश ब्राम्हणे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वात सपोनि. महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार - सुनिल लासुरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, दिपक सुंदरकर, मंगेश परिमल, मनोज ठोसर, सचिन बाहाळे, जहीर शेख, अतूल संभे, नईम बेग, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, चेतन गुल्हाणे, संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली आहे.

# अल्पवयीन दोन बालकांवर बलात्कार प्रकरणातील आरोपीची उच्च न्यायालयातून निर्दोष सुटका

प्रतिनिधी १८सप्टेंबर

**अमरावती :** संक्षिप्तपणे खटला असा आहे की, फिर्यादी यांनी दिनांक 9/9/2020 रोजी बाभुळगाव पो स्टे येथे तक्रार दिली की, सदर घटनेतील आरोपी याने फिर्यादी याचे घरी त्याचा अल्पवयीन मुलगा वय ७ वर्ष ९ महीने हा एकटा असल्याचे पाहुन फिर्यादीचे घरी येवुन पिडीत मुलगा यास घरातील पंलगावर घेवुन बसुन पिडीत बालक याचे सोबत वारंवार अनैसर्गीक कृत्य करून बलात्कार केला.तसेच यातील

## आदिशक्ती साहित्य संमेलन संपन्न

इतर साक्षदार च्या घरी जावुन त्याचा अल्पवयीन मुलगा वय ६ वर्ष १४ महीने याच्या गालाचा मुका घेवुन चिमटा घेतला व त्याचे सोबत अश्लिल कृत्य केले. अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेन्यात आला .फिर्यादीने दिलेला रिपोर्ट आधारे आरोपी विरुध्द अपराध क्र.345/2020 प्रमाणे पोलीस स्टेशन बाभुळगाव येथे कलम 377, 354 भांदवी वा कलम 4,6,8,12 पोकसो अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. तपासा दरम्यान, तपासी अंमलदाराने साक्षीदारांचे जबाब नोंदविले. घटनास्थळ पंचनामा पंचांसमक्ष तयार केला. आणि आरोपीच्या विरोधात दोषारोप पत्र दाखल करून प्रकारण न्याय प्रविष्ठ करण्यात आले आणि विशेष सेशन जज यवतमाळ ह्यांच्या समोर वर्ग करण्यात आला. सदर प्रकरणात दोषारोप सिद्ध करण्याकरिता सरकार पक्षाने एकूण 5 साक्षदार तपासले. आणि खटल्या अंती विद्यमान विशेष सत्र न्यायालय यवतमाळ ह्यांनी आरोपीला 20 वर्षे सश्रम करावास व 20000/- रु दंड अशी शिक्षा दि 24/5/2023 रोजी सुनवली, सदर शिक्षेला व्यथित होऊन आरोपीने विद्यमान उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे अपील क्र 494/2023 दाखल केले, सदर अपील मध्ये आरोपी तर्फे ऍड सपना जाधव ह्यांनी बाजू मांडले.ऍड सपना जाधव ह्यांनी आरोपी तर्फे असे मांडले की, सर्व साक्षीदाऱ्यांच्या पुराव्यांचे एकत्रीत अवलोकन केल्यास आरोपींनी नमूद केल्या प्रकारे घटना घडली नाही व अशे कृत्य केलेच नाही.

# ग्रामाचे वास्तवचित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य - डॉ. श्रीकांत पाटील

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अमरावती :** ग्रामा मधील माणूस ,त्याचे जगणे,श्रम, दुःख, आशा आकांक्षा, निसर्गाशी असलेले नाते, शेतीचेप्रश्न ,दुष्काळ पाऊस, कर्ज ,बाजारपेठ स्थलांतर ,आदिंचे सर्वांगीण वास्तव चित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य होय अशा आशयाचे उद्गार डॉ. श्रीकांत पाटील यांनी काढले. आदिशक्ती बहुउद्देशीय संस्था अमरावतीच्या वतीने तिसऱ्या आदिशक्ती

## आदिशक्ती साहित्य संमेलन संपन्न



मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन विमलाबाई देशमुख महाविद्यालयात करण्यात आले होते या प्रसंगी संमेलना ध्यक्ष म्हणून बोलताना त्यांनी वरील विचार व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले ग्रामीण साहित्याने शहरात बसलेल्या वाचकाला गावातील मातीचा गंध दिला, शेतकऱ्याच्या कपाळावरचे घामाचे थेंब आणि शेतमजुरांच्या हातावरील घट्टे दाखवले. पावसाकडे आशेने पाहणारे शेतकऱ्याचे डोळे दाखवले. आज शेती बदलली आहे शेतीसमोर नवे प्रश्न उभे आहेत. शेतमालाला योग्य भाव नसणे, पाणीटंचाईचे संकट, जमिनीचे तुकडेकरण मूलभूत सुविधांचा अभाव या सर्वांचे दस्तऐवजीकरण ही ग्रामीण साहित्याची जबाबदारी आहे.

# मेळघाटातील नोकरीची बनावट ऑर्डर देऊन आदिवासींची फसवणूक

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**धारणी :** मेळघाट हा आदिवासी बहुल क्षेत्र मध्ये धारणी तालुका या मध्ये बेरोजगार युवक व युवती खूप शिकून खाजगी व शासकीय नोकरीच्या शोधात असताना कोणीतरी शुभचिंतक युवकांवर लक्ष ठेवून आहे याचे भान ठेवण्यासाठी नेहमी सतर्क राहिले पाहिजे असे म्हटले जात आहे.असाच एक प्रकार टपाल

विभागात सरकारी नोकरीचे स्वप्न दाखवून धारणी येथील तिघांची एका भामट्याने तब्बल २१ लाख १० हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी फिर्यादी नानकराम कास्देकर यांच्या तक्रारीवरून धारणी पोलिसांनी १५ सप्टेंबर रोजी रात्री बाबू बन्सी धुर्वे वय ५१, रा. धारणी या भामट्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. आरोपीने नानकराम कासदेकर यांच्यासह अन्य दोन तरुणांची देखील आर्थिक फसवणूक केली.

संशयित बाबू धुर्वे हा एम एस ई बी कार्यालय, धारणी येथे ऑपरेटर म्हणून नोकरीस होता. तो नातेवाईक असल्याने नानकराम व त्याच्यात ओळख होती. याच विश्वासाचा फायदा घेऊन आरोपीने मे २०२३ मध्ये फिर्यादीच्या मुलीला पोस्टमन पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले. यासाठी फिर्यादीची तब्बल ५ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली. तिला बोगस नियुक्तीपत्र ही दिले. तिला पोस्ट खात्यात रुजू होण्यासाठी अमरावतीला देखील पाठविण्यात आले.

मात्र तेथे गेल्यानंतर फसवणुकीचा प्रकार उघड झाला. आरोपीने सुरेश कास्डेकर यांच्या मुलालाही पोस्टात नोकरी लावण्याचे सांगून ७ लाख ६० हजार रुपये उकळले. तर मोगर्दा येथील नामदेव सुडसकर यांच्या मुलाला नोकरीची खोटी ऑर्डर्स देऊन ८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद आहे. अशा बनावट फसवणुकीच्या लोकांपासून सावधान राहण्याची सूचना धारणी पोलीस स्टेशन येथील ठाणेदार अवतार सिंग चव्हाण यांनी केली.

# पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त अमरावतीत अनोखा सोहळा

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अमरावती :** देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस संपूर्ण देशात विविध उपक्रमांनी साजरा होत असताना, अमरावतीमध्ये एका खास आणि आनंददायी वातावरणात हा दिवस साजरा करण्यात आला. अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी शिव सांस्कृतिक गणेशोत्सव मंडळामध्ये लहान मुलांना सोबत घेऊन पंतप्रधान मोदींचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला .या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे परिसरातील शेकडो लहान मुलांचा उत्स्फूर्त सहभाग होता. माजी खासदार नवनीत राणा यांच्या हस्ते आणि बालगोपाळांच्या



उपस्थितीत सुंदर केक कापण्यात आला केवळ केक कापूनच नव्हे, तर या सोहळ्याचे रूप अधिक प्रकाशमय करण्यासाठी तर एकदंतगणेशोत्सव मंडळात शेकडो दिवे (पणत्या) लावून अनोख्या पद्धतीने शुभेच्छा देण्यात आल्या. दिव्यांच्या उजेडात उजळून निघालेला हा परिसर आणि बालगोपाळांचा सहभाग यामुळे हा वाढदिवस अमरावतीकरांसाठी एक स्मरणीय सोहळा ठरला.

# जन्म-मृत्यू प्रमाणपत्रासाठी नागरिकांनी SMS प्राप्त झाल्यानंतरच कार्यालियात यावे

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अमरावती :** जन्म व मृत्यू प्रमाणपत्र तसेच जन्म नोंदीतील दुरुस्ती (Correction) संदर्भात अमरावती महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांसाठी महत्त्वाची सूचना जारी केली आहे. नागरिकांनी अनावश्यक गर्दी टाळून संबंधित नियम व प्रक्रियेचे पालन करण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

ज्या नागरिकांनी जन्म/मृत्यू प्रमाणपत्रासाठी अथवा सन 2016 नंतरच्या नोंदींच्या Correction साठी संबंधित झोन कार्यालयात अर्ज केला आहे, त्यांचे प्रमाणपत्र त्याच संबंधित झोन कार्यालयातून वितरित करण्यात येणार आहे. अशा नागरिकांना प्रमाणपत्र घेण्यासाठी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. तसेच Correction पूर्ण झाल्याचा SMS प्राप्त झाल्यास, SMS मधील लिंकवर क्लिक करून नागरिकांना घरबसल्या प्रमाणपत्र डाउनलोड करता येणार आहे. प्रमाणपत्र जारी झाल्याचा SMS प्राप्त झाल्यानंतरच नागरिकांनी संबंधित कार्यालयात प्रमाणपत्र घेण्यासाठी यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ज्या नागरिकांनी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात अर्ज केला आहे, त्यांचे प्रमाणपत्र मुख्य कार्यालयातूनच वितरित करण्यात येणार आहे. त्यासाठीही प्रमाणपत्र जारी झाल्याचा SMS प्राप्त झाल्यानंतरच नागरिकांनी कार्यालयात यावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

'Add Old Event' म्हणजे सन 2016 पूर्वीच्या जन्म नोंदी. ज्या अर्जदारांकडे जुन्या जन्म नोंदीचा जुना जन्म दाखला उपलब्ध आहे, अशाच प्रकरणांना पुढील मंजुरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येणार आहे.

ज्या अर्जदारांकडे जुना जन्म दाखला उपलब्ध नाही, त्यांचे 'Add Old Event' अंतर्गत अर्ज नामंजूर (Rejected) करण्यात आले आहेत. अर्जाची स्थिती तपासण्याचे आवाहनमंजूर झालेली प्रमाणपत्रे तसेच नामंजूर झालेल्या अर्जांची यादी संबंधित झोन कार्यालयात तसेच अमरावती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे सायबर जनजागृतीसाठी 'व्हॉकथॉन'

**अमरावती :** नागरिकांमध्ये दक्षता, पारदर्शकता, तसेच वाढत्या सायबर फसवणुकीबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे 'व्हॉकथॉन' उत्साहात पार पडले. या जनजागृती उपक्रमाचे नेतृत्व सेंट्रल बँक ऑफ इंडिया अमरावती विभागाचे विभागीय प्रमुख सुनील पांडेय यांनी केले. यावेळी उप क्षेत्रीय व्यवस्थापक प्रदीप जाधव, जिल्हा अग्रणी व्यवस्थापक नरेश हेडाऊ, तसेच सतर्कता अधिकारी राहुल कुमार गोंड प्रमुख उपस्थित होते.

या व्हॉकथॉनमध्ये अमरावती विभागातील सर्व शाखांचे शाखा व्यवस्थापक, अधिकारी आणि कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. नागरिकांनी सतर्क राहून कोणत्याही प्रकारच्या सायबर फसवणुकीला बळी पडू नये, तसेच दक्ष आणि जबाबदार नागरिक म्हणून भूमिका बजावावी, असा संदेश या रॅलीद्वारे नागरिकांना देण्यात आला.

# पीएम विश्वकर्मा योजनेत जिल्हा राज्यात अव्वल; कर्जमंजुरी, टूलकिटचे वाटप

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अमरावती:** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवासंकल्प अभियानात बचत भवन येथे 'विश्वकर्मा लाभार्थी मेळावा' उत्साहात पार पडला. यात पीएम विश्वकर्मा योजनेतील लाभार्थ्यांना कर्जमंजुरी पत्रे आणि टुलकिटचे वाटप करण्यात आले.

खासदार डॉ. अनिल बोंडे अध्यक्षस्थानी होते, यावेळी आमदार प्रवीण तायडे, पीएम विश्वकर्मा समितीचे अध्यक्ष दिलीप आकोटकर, पीएम विश्वकर्मा योजना जिल्हा समितीचे सदस्य सोपान गुढदे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे, टपाल खात्याचे अधीक्षक पी. ए. गेडाम, जिल्हा अग्रणी व्यवस्थापक नरेश हेडाऊ उपस्थित होते. पीएम विश्वकर्मा योजनेत जिल्ह्याने उल्लेखनीय प्रगती केली आहे. यात २४ हजार लाभार्थी नोंदणी करण्यात आली असून २१ हजार लाभार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यात १८ हजार लाभार्थींनी टूलकिटचे वाटप करण्यात आले आहे. तसेच ६ हजार ६४० लाभार्थ्यांना बँकांकडून कर्ज मंजुरी झाली असून ५ हजार ४९५ लाभार्थ्यांना ४३ कोटी रुपये प्रत्यक्ष कर्ज वाटप वितरीत करण्यात आले आहे.

खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी ही योजना विकसित भारताच्या संकल्पनेला बळ देणारी असल्याचे सांगून नोंदणीकृत प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा फायदा पोहोचवण्याचे आवाहन केले. आमदार प्रवीण तायडे यांनी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेचे कौतुक करीत पहिल्या कर्जाचा नियमित भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांना तात्काळ दुसरे कर्ज उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर, खासदार डॉ. अनिल बोंडे आणि आमदार प्रवीण तायडे यांच्या मार्गदर्शनामुळे जिल्ह्याने प्रशिक्षण, टूलकिट वाटप आणि कर्ज मंजुरी या तिन्ही बाबींमध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावला असल्याचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे यांनी प्रास्ताविकात सांगितले. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात १७ लाभार्थ्यांना कर्जमंजुरी पत्रे आणि १० लाभार्थ्यांना टूलकिट प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

# अमरावती विभागातून अभ्यासपूर्ण अभिप्राय व सूचना प्राप्त –अपर मुख्यसचिव व्ही. राधा

## भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी टास्क फोर्स दीर्घकालीन मसुदा तयार करणार

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अमरावती :** भरती प्रक्रिया सुधारणा करण्यासंदर्भात अमरावती विभागातील हितधारकांकडून अभ्यासपूर्ण अभिप्राय व सूचना प्राप्त झाल्या आहेत. राज्यातील सर्व महसुली विभागातून प्राप्त सूचनांचा सखोल अभ्यास करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह (एमपीएससी) अन्य परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक,परिक्षार्थीस्नेही व सुटसूटित करण्यासाठी निर्धारीत कालावधीत उच्चस्तरीय स्टास्क फोर्स दीर्घकालीन मसुदा तयार करेल,अशी माहिती सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्यसचिव तथा उच्च स्तरीय



टास्क फोर्सच्या अध्यक्ष व्ही. राधा यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. श्रीमती राधा यांच्या अध्यक्षतेखालील भरती प्रक्रिया सुधारणेसाठी नियुक्त उच्चस्तरीय टास्क फोर्सने पहिल्या सत्रात येथील नियोजन भवनात विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, लोकप्रतिनिधी व नागरिक आदी हितधारकांकडून अभिप्राय व सूचना ऐकूण घेतल्या. त्यानंतर महसूल भवनात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव तथा टास्क फोर्सचे सदस्यसचिव डॉ.एन.रामास्वामी , विभागीय आयुक्त नयना गुंडे,जिल्हाधिकारी आशिष येरेकर,मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी ,अपरआयुक्त (सा.प्र.)संजय जाधव यावेळी उपस्थित होते.

सरळसेवेबाबत अत्यंत सखोल व अभ्यासपूर्ण अभिप्राय व सूचनांसह पोलीस उपनिरीक्षक पदभरती प्रक्रिये विषयी, एमपीएससीद्वारे घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) असावी, या परीक्षांचे वार्षिक वेळापत्रक असावे, या परिक्षांसाठी वार्षिक शुल्क आणि नोंदणी असावी,परीक्षांचे वेळेत निकाल लागावे, प्रश्नपत्रिका सुरक्षित राहण्यासाठी प्रसंगी डिजीलॉकरचा उपयोग व्हावा.




# अतिवृष्टीच्या वेळेस झाला अन्याय, कोरडा दुष्काळात तरी द्या न्याय !

*मागच्या वर्षी नाही मिळाला न्याय; पालकमंत्री रिसोड तालुक्यावरचं का, करतात अन्याय?
*खंडीत पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या पाहणीत जिल्ह्यातील पाच तालुके; रिसोडचं का वगळले...

•प्रभाकर नाईकवाडे @ केनवड•

मागील वर्षी अतिवृष्टी व नदीच्या पुरामुळे रिसोड तालुक्यातील पिंप्री सरहद्द, कुकसा, जोगेश्वरी, नेतंसा. जायखेडा यासह नदीकाठच्या परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अनेक शेतांमध्ये मातीऐवजी दगड उरले, मात्र नुकसानग्रस्त अनेक शेतकऱ्यांना अपेक्षित मदत मिळाली नसल्याची तक्रार आजही कायम आहे. या परिसराचा मागच्या वर्षी पालकमंत्र्याचा नियोजित दौरा हा होता इन वेळेवर या परिसरातील दौरा हा पालकमंत्र्यांनी रद्द करून तालुक्यातील दुसऱ्या ठिकाणी भेटी दिल्या होत्या मग यावर्षीही रिसोड तालुक्यावरचं अन्याय का ? असा संतप्त सवाल शेतकरी करत आहेत.







मागील वर्षीच्या नुकसानीचा न्याय मिळालेला नसतानाच यंदा पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे पिके संकटात असताना पालकमंत्र्यांच्या पीक पाहणी दौऱ्यातून पुन्हा रिसोड तालुक्यालाचं वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.माननीय श्री दत्तामामा भरणे पालकमंत्री यांचा उद्या दिनांक १९ सप्टेंबर शनिवार रोजी वाशिम जिल्ह्यातील खंडीत पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान याची पाहणी करण्यासाठी नियोजित दौरा आहे, त्यामध्ये वाशिम जिल्ह्यातील पाच तालुक्यांचा समावेश आहे मग रिसोडचं का वगळले सवाल येथील शेतकऱ्यांनी केला आहे.

पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या वाशिम जिल्ह्यातील पीक पाहणी दौऱ्यात वाशिम, मंगरूळपीर, मानोरा, मालेगाव आणि कारंजा या पाच तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र, रिसोड तालुक्याला या पाहणी दौऱ्यात स्थान न मिळाल्याने 'रिसोड तालुक्यावरच का अन्याय?' असा सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत.रिसोड तालुक्यात गेल्या दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने सोयाबीन, तूर यासह विविध पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. कोरडवाहू शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत असून, सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांनाही अनियमित वीजपुरवठ्याचा फटका बसत आहे.मागील वर्षी पुराच्या तडाख्याने शेतीचे नुकसान झाले, यंदा पावसाच्या खंडाने पिके संकटात आली; तरीही पीक पाहणीच्या दौऱ्यात रिसोडला वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले जात असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

पालकमंत्र्यांनी दौऱ्यात रिसोड तालुक्याचा समावेश करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर प्रत्यक्ष जावे आणि पिकांची पाहणी करावी, अशी मागणी पिंप्री सरहद्द, कुकसा, जोगेश्वरी, नेतंसा जायखेडा परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

## पालकमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांचा उद्या जिल्हा दौरा !

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•



राज्याचे कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे हे दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी वाशिम जिल्ह्यातील विविध गावांना भेट देऊन पिक परिस्थितीची पाहणी करणार आहेत. त्यांचा वाशिम जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

दुपारी २ वाजता झोडगा, ता. मालेगाव, दुपारी २.३० वाजता सुपखेला, ता. वाशिम , दुपारी ३ वाजता वरुड बुद्रुक, ता. मंगरूळपीर त्यानंतर सायंकाळी ३.४५ वाजता कुपटा, ता. मानोरा आणि सायंकाळी ४.३० वाजता खेरडा, ता. कारंजा (लाड) येथे पिक परिस्थितीची पाहणी करून सायंकाळी ५ वाजता कारंजा (लाड) येथून अकोला जिल्ह्याकडे प्रयाण करतील.

## थोडक्यात

### य.च.महाविद्यालयात मराठी विभागातर्फे सेमिनार स्पर्धा

•सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर•

श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ कासोळा द्वारा संचालित यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागातर्फे प्राचार्य डॉ. आर. एन. सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८ऑगस्ट २०२६ रोजी सेमिनार स्पर्धेचे आयोजन डॉ. शरद वाघोळे (मराठी विभाग प्रमुख) प्रा. डॉ. प्रमोद देवके यांनी केले. ही सेमिनार स्पर्धा बी. ए. भाग १ सेम- १ च्या वर्गाकरिता आयोजित करण्यात आली होती. सर्व प्रथम प्रा. डॉ. प्रमोद देवके यांनी सेमिनार स्पर्धा आयोजनामागील उद्देश स्पष्ट केले. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक -गौरी गोपाल भोयर, द्वितीय क्रमांक - पवन रमेश येवले, तृतीय क्रमांक-पुनम विजय भोयर, यांनी पटकाविला. सर्वच विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सेमिनार सादर केले. त्यामध्ये साक्षी पाकधाने, आफ्रीन चौधरी, नम्रता भेंडेकर, संस्कृती दुबळगुंडे, अश्विनी आमटे, साक्षी लठाढ, सानिया गारवे, प्रेरणा मुंजे, दीप्ती मिसाळ इत्यादी विद्यार्थ्यांचा समावेश होता. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. प्रमोद देवके यांनी काम बघितले.

### य.च.महाविद्यालयात मराठी विभागातर्फे निबंध स्पर्धा

•सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर•

श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ कासोळा द्वारा संचालित यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागातर्फे प्राचार्य डॉ. आर. एन. सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८ऑगस्ट २०२६ रोजी सेमिनार स्पर्धेचे आयोजन डॉ. शरद वाघोळे (मराठी विभाग प्रमुख) प्रा. डॉ. प्रमोद देवके यांनी केले. ही सेमिनार स्पर्धा बी. ए. भाग १ सेम- १ च्या वर्गाकरिता आयोजित करण्यात आली होती. सर्व प्रथम प्रा. डॉ. प्रमोद देवके यांनी सेमिनार स्पर्धा आयोजनामागील उद्देश स्पष्ट केले. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक -गौरी गोपाल भोयर, द्वितीय क्रमांक - पवन रमेश येवले, तृतीय क्रमांक-पुनम विजय भोयर, यांनी पटकाविला. सर्वच विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सेमिनार सादर केले. त्यामध्ये साक्षी पाकधाने, आफ्रीन चौधरी, नम्रता भेंडेकर, संस्कृती दुबळगुंडे, अश्विनी आमटे, साक्षी लठाढ, सानिया गारवे, प्रेरणा मुंजे, दीप्ती मिसाळ इत्यादी विद्यार्थ्यांचा समावेश होता. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. प्रमोद देवके यांनी काम बघितले. या स्पर्धेकरिता बी. ए. भाग १ च्या सर्वच विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. स्पर्धा उत्साहात पार पडली.

## लघुपाटबंधारे विभागाने पैसे गिळून डोळे झाकले; समृद्धीवाल्यांनी धरणाच्या भिंतीवर खोदकाम करून सोलार ठोकले!

•सिटी न्युज ब्युरो @ केनवड•

रिसोड तालुक्यातील कुकसा लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या धरणाच्या भिंतीवर समृद्धी महामार्गाशी संबंधित सोलार यंत्रणा बसविण्यासाठी खोदकाम करण्यात आल्याचे समोर आले असून, या प्रकारामुळे प्रकल्पाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. धरणाची भिंत ही जलसाठा व प्रकल्पाच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची असताना त्यावर अशा पद्धतीने खोदकाम करण्यास परवानगी कोणी दिली? संबंधित लघुपाटबंधारे विभागाने याकडे दुर्लक्ष का केले, असा संतप्त सवाल शेतकरी व नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

समृद्धी महामार्गालगतच्या झाडांसाठी कुकसा प्रकल्पातील पाण्याचा वापर करण्यासाठी सोलार यंत्रणा उभारण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र या यंत्रणेसाठी धरणाच्या भिंतीवरच खोदकाम करण्यात आले असल्याने प्रकल्पाच्या संरचनेला त्याचा काही धोका निर्माण होतो का, याची तांत्रिक तपासणी होणे गरजेचे आहे. या कामासाठी संबंधित विभागाची लेखी परवानगी होती का? कोणत्या आदेशानुसार सोलार बसविण्यात आले? धरणाच्या भिंतीवर खोदकाम करण्यास तांत्रिक मान्यता देण्यात आली होती का?



तसेच या वापरासाठी संबंधित विभागाला कोणते शुल्क अथवा रक्कम देण्यात आली असल्यास त्याची अधिकृत नोंद काय आहे,

हेही स्पष्ट होणे आवश्यक आहे.दरम्यान, 'पैसे घेऊन डोळे झाकले'

### नियम आणि सुरक्षेवर गंभीर प्रश्न

हा आरोप स्थानिकांकडून केला जात असल्यास त्याची सत्यता अधिकृत कागदपत्रे, परवानगी व आर्थिक व्यवहारांच्या नोंदी तपासूनच स्पष्ट होऊ शकते. त्यामुळे संबंधित विभागाने या प्रकरणातील सर्व कागदपत्रे जनतेसमोर आणावीत, अशी मागणी होत आहे.कुकसा प्रकल्पातील जलसाठा सध्या मर्यादित असताना पाणीउपशाचा मुद्दा आधीच चर्चेत आहे. त्यात आता धरणाच्या भिंतीवर सोलारसाठी खोदकाम झाल्याने लघुपाटबंधारे विभागाच्या देखरेखीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

धरणाच्या भिंतीवर खोदकाम करण्याची परवानगी कोणी दिली आणि नियमांचे उल्लंघन झाले असल्यास संबंधितांवर काय कारवाई होणार? याचा खुलासा लघुपाटबंधारे विभागाने तातडीने करावा. तसेच तज्ज्ञांकडून धरणाच्या भिंतीची तपासणी करून संरचनेवर कोणताही परिणाम झाला नसल्याची खात्री करावी, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

## शेअर बाजारामधील मंदी, धोका नव्हे, नवीन संधी !

*वाशीममध्ये २६ सप्टेंबरला सेमिनार *लाभ घ्या- अक्षय जैन यांच्या आव्हान

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

शेअर बाजार, म्युच्युअल फंड, एसआयपी आणि आर्थिक नियोजनाबाबत योग्य व व्यवहार्य माहिती मिळावी, यासाठी विद्यासागर शेअर मार्केट इन्स्टिट्यूट, वाशिम यांच्या वतीने एकदिवसीय मोफत सेमिनार आयोजित करण्यात आला आहे. या सेमिनारमध्ये शेअर बाजारातील मंदी हे धोका नव्हे तर संधी आहे यासंबंधी संपूर्ण मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी या सेमिनारचा लाभ घ्यावा असे आवाहन अक्षय जैन यांनी केले आहे.



हा सेमिनार २६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता विद्यासागर शेअर मार्केट इन्स्टिट्यूट येथे होणार आहे. सेमिनारमध्ये शेअर बाजाराची मूलभूत माहिती, म्युच्युअल फंड व SIP, रिस्क मॅनेजमेंट, वेल्थ क्रिएशनची रणनीती आणि आर्थिक स्वातंत्र्याच्या दिशेने वाटचाल याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.MBA in Finance असलेले अक्षय जैन (इदल्ही ' शहूदे, Vidyasagar Share Market Institute) मार्गदर्शन करणार आहेत. शेअर बाजाराबाबत असलेले गैरसमज दूर करून योग्य पद्धतीने गुंतवणुकीचे नियोजन कसे करावे, योग्य स्टॉकची निवड, एग्झ कशी व किती करावी तसेच भविष्यासाठी आर्थिक नियोजन कसे करावे, याची माहिती सेमिनारमध्ये दिली जाणार आहे.या उपक्रमात गृहिणी, विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक तसेच निवृत्त नागरिक सहभागी होऊ शकतात. सेमिनार पूर्णपणे मोफत असून नोंदणी आवश्यक आहे. इच्छुकांनी संस्थेशी संपर्क साधून आपली जागा निश्चित करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी : ९८२२५४५९५७/९०११५४५९५७.

## सिटी न्यूज सुपरफास्ट बातमी खास, दखल हमखास




## प्रकल्पातील पाणीउपसा करणारे सोलार बंद; ठोकले कुलूप !

•सिटी न्युज ब्युरो @ केनवड•

कुकसा लघु प्रकल्पात केवळ १८ टक्के जलसाठा शिल्लक असताना समृद्धी महामार्गलगतच्या झाडांसाठी पाणीउपसा सुरू असल्याचे सिटी न्यूज सुपरफास्टने १६ सप्टेंबर रोजी ठळकपणे प्रकाशित केले होते. या वृत्ताची दखल घेत १७ सप्टेंबर रोजी पाणीउपशासाठी वापरण्यात येणारी सोलार यंत्रणा बंद करण्यात आली असून, संबंधित सोलारला चक्क कुलूप ठोकण्यात आले आहे.

पावसाने दीड महिन्यापासून दडी मारल्याने केनवड परिसरातील सोयाबीन, तूर यासह खरीप पिके संकटात आहेत. अशा परिस्थितीत



कुकसा प्रकल्पातील मर्यादित जलसाठ्यातून समृद्धी महामार्गावरील झाडांसाठी पाणीउपसा सुरू असल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये नाराजी होती.

सिटी न्यूज सुपरफास्टने १६ सप्टेंबर रोजी 'कुकसा लघु प्रकल्पात १८ टक्के जलसाठा; विभागाने घेतल्या नोटा, समृद्धी महामार्गाला पाणी उपसण्याचा दिला वाटा!' या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करून पाणीउपशाला परवानगी कोणी दिली, किती पाणी उपसले जात आहे आणि मर्यादित जलसाठ्याचे नियोजन कसे केले जात आहे, असे सवाल उपस्थित केले होते.वृत्त प्रकाशित झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी सोलार यंत्रणा बंद करून कुलूप ठोकण्यात आल्याने वृत्ताची दखल घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र सोलार बंद करण्यामागील अधिकृत कारण, पाणीउपशाची परवानगी आणि आतापर्यंत किती पाणी वापरण्यात आले, याबाबत संबंधित विभागाने स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे.सिटी न्यूज सुपरफास्टच्या वृत्तानंतर प्रशासनाची हालचाल; मात्र कुकसा प्रकल्पातील पाण्याच्या नियोजनाबाबत पुढील निर्णय काय? याकडे आता शेतकरी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## समाजसेवी, परोपकारी-जुगलकिशोर कोठारी

### कामात भारी, अनेकांसोबत यारी...

वाशीम जिल्ह्यातच नव्हेतर महाराष्ट्रात समाजसेवी आणि परोपकारी म्हणून ख्याती असलेले व्यापारी मंडळ आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायत वाशीम जिल्ह्याचे अध्यक्ष जुगलकिशोर कोठारी आज त्यांच्या वयाची एकसष्टी पार करून ६५ व्या वर्षात पदार्पण करत आहेत.आजही त्यांच्या व्यापाराच्या व्यस्त कामातही त्यांचेकडे येणाऱ्या सर्व सामान्यांपासून आजी-माजी लोकप्रतिनिधींचेही अनेक कामे मार्गी लावण्यासाठी जुगलभाऊंची धडपड कौतुकास्पद आहे.

जुगलकिशोर नारायणदास कोठारी यांचा जन्म १८ सप्टेंबर १९६२ रोजी रिसोड नगरीत झाला.त्यांचे इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण रिसोडच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले.पुढे पाचवी ते दहावी पर्यंत वाशीम येथील श्री बाकलीवाल विद्यालयात नंतर अकरावी, बारावी विज्ञान शाखेचे शिक्षण अकोला येथील आरएलटी महावाद्यालयात झाले.बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर भाऊंनी पुणे येथील महाराष्ट्र प्रिटींग टेक्नॉलॉजी मध्ये तीन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करुन वाशीम शहरामध्ये २२ मे १९८२ रोजी कोठारी फाईन आर्ट प्रिंटर्स या मुद्रण व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली.भाऊंना समाजसेवेचा वारसा त्यांच्या आई वडीलांकडून मिळाला आहे.त्यामुळे त्यांनी आपल्या शालेय व महाविद्यालयीन जीवनामध्येही गरजूंना मदत आणि सहकार्य करून अनेकांचे जीवन सार्थकी लावण्यासाठी पुढाकार घेतला. भाऊंचा परिवार संघ परिवाराशी जोडलेला असल्याने भाऊंनी विश्वहिंदू परिषदेच्या माध्यमातून १९८२ पासूनच राम जन्म भूमी आंदोलना पासून सक्रिय सहभाग घेतला. नंतर १९८३ मध्ये युवक कॉंग्रेसचे शहर अध्यक्ष म्हणून त्यांनी पक्षाच्या कार्यास प्रारंभ केला.तत्पुर्वी १९८० च्या विधानसभा व लोकसभा निवडणूकीमध्येही भाऊंनी तत्कालीन वाशीमचे आमदार पापालाल डेंडुळे आणि वाशीमचे खासदार गुलाब नबी आझाद यांच्या सोबत पक्षकार्य करून सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडवून गरजूंना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला. १९८४, १९८९, १९९१, १९९६, १९९९, २००४, २००९ च्या विधानसभा व लोकसभा मतदार संघातील विजयी झालेल्या सर्व आजी, माजी, दिवंगत लोकप्रतिनिधींना सुद्धा तन, मन, धनाने सहकार्य केले आहे.भाऊंनी १९८६ ते १९९२ पर्यंत नागपूर पत्रिका व नागपूर टाईम्स या वृत्तपत्राचे आणि १९९० ते १९९२ मातृभूमि चे पत्रकार म्हणून वाशीम मध्ये काम केलेले आहे.त्यांना पत्रकारितेचे ज्ञान असल्यामुळे ते नवोदित पत्रकारांना मार्गदर्शनही करतात. नंतर भाऊ व्यापारी मंडळ आणि लॉयन्स क्लब सोबतच अखिल भारतीय ग्राहक पंचायत सह विविध समाजसेवी आणि धार्मिक कार्यामध्ये अविरतपणे कार्य करून जनसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतात.भाऊंना अनेकवेळा नैसर्गिक व मानव निर्मित संकटांना सामोरे जाण्याची वेळ आली, पण भाऊंनी आपल्या सामर्थ्याने त्या सर्व संकटांना आणि ती संकटे निर्माण करणाऱ्यांना पळवून लावले. भाऊंना अध्यात्माची आवड असल्यामुळे त्यांचेकडे अनेक संत, महात्मे यांचे येणे जाणे सुरूच असते.आपण इतरांच्या किती कामी येतो आणि कसे येतो अशी परोपकारी दृष्टी भाऊंना लाभली असून भाऊंनी अनेकांचे जीवन सार्थकी लावले आहे.



## वाशीममध्ये १८ व १९ सप्टेंबरला मोफत हृदयरोग तपासणी शिबिर

*कार्डियाक अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टीसह विविध तपासण्या
*गिरीधारीलालजी सारडा मित्र मंडळाचा उपक्रम

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•



समाजसेवेच्या भावनेतून नागरिकांच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबवित गिरीधारीलालजी सारडा मित्र मंडळाच्या वतीने वाशिम येथे दोन दिवसीय मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर १८ व १९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळपासून आयोजित करण्यात आले आहे.

ज्येष्ठ समाजसेवक गिरीधरलालजी सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त व लाइफ लाईन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, वाशिम यांच्या सहकार्याने होणाऱ्या या शिबिरात हृदयरोग तपासणी, मोफत ण्ड, आवश्यक रक्त तपासण्या तसेच गरजेनुसार कार्डियाक अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.सारडा यांचे जय गजानन कृषी बाजार, हिंगोली रोड, वाशिम येथे हे शिबिर होणार आहे. छातीत दुखणे किंवा जडपणा जाणवणे, हृदयरोगाचा कौटुंबिक इतिहास असणे, वय ५० वर्षांपेक्षा अधिक असणे तसेच उच्च रक्तदाब किंवा मधुमेह असलेल्या नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. शिबिरात डॉ. सौरभ भूतडा (M.B.B.S., M.D. Medicine) आणि डॉ.रिझवान देशमुख (MD Medicine, DM Cardiology, Interventional Cardiologist) यांची वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहे.अधिक माहितीसाठी लाइफ लाईन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, वाशिम – ९४२८२२११११ या क्रमांकावर संपर्क साधावा. नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन गिरीधारीलालजी सारडा मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



# शेतकऱ्यांना दिवसा 8 तास अखंड वीज पुरवठा द्या

## माजी आ. राणा दिलीपकुमार सानंदा , स्मार्ट मिटर लावण्याचा आग्रह करत असाल तर स्मार्ट रोहित्रही द्या

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**खामगाव :** खामगाव विधानसभा मतदार संघामध्ये गेल्या ४० ते ४५ दिवसांपासुन पाऊस नव्हता अश्या वेळेस शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह हा हंगामी पिकांवर अवलंबुन आहे.त्या माध्यमातून पाण्याची सुविधा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आल्या.पावसाळयाचे दिवस असतांना सुध्दा फक्त एक-दोन दिवस तोही कमी प्रमाणात पाऊस पडला. रोहित्र जळाल्यानंतर नियम असा आहे की, २४ तासाच्या आत ते रोहित्र दिले पाहिजे.

वेळेवर रोहित्र मिळाले नाही, व वरुण राजाही बरसला नाही अश्या परिस्थितीमध्ये काही ठिकाणी विहिरींना पाणी असुन सुध्दा रोहित्र जळाल्यामुळे त्यांना पाणी देता येत नव्हतं,महावितरणचे अधिकारी-कर्मचारी हे फोन उचलत नव्हते. फोन उचलले तर उडवा-उडवीचे उत्तरे देत होते. महावितरणच्या कारभाराबदद्ल शेतकरी बांधवांमध्ये तीव्र संताप होता. म्हणून दि.१५ सप्टेंबर २०२६ रोजी खामगाव येथील कार्यकारी अभियंता यांच्या दालनात कास्तकार बांधवांना घेवुन त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अभियंत्यांना जाब विचारला.८ ज्या ठिकाणचे रोहित्र जळाले त्या ठिकाणी शक्यतो २४ तासाच्या आत रोहित्र दिले जातील, सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या प्रमाणे स्मार्ट मिटर लावण्याचा त्यांचा आग्रह असतो, त्या विषयी मोठया प्रमाणात तक्रारी आहेत.

खामगाव मतदार संघातील रोहित्रांची अत्यंत दयनीय परिस्थिती आहे त्या जळुन केव्हाही अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्मार्ट मिटरचा तुमचा आग्रह आहे तेव्हा त्याच प्रमाणे स्मार्ट रोहित्र खामगाव विधानसभा मतदार संघात बसवावे व दिवसामध्ये ८ तास सलग विज शेतकरी बांधवांना द्यावी.

अन्यथा बळीराजासाठी तीव्र आंदोलन करणार असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता सखाराम थानवी यांना दिला. यावेळेस त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पंजाबरावदादा देशमुख, खामगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने, शहर उपाध्यक्ष नरहरी टिकार गुरुजी, खामगाव राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष मनोज वानखडे, अल्पसंख्यांक तालुका अध्यक्ष बिलाल खाँ पठान, कृ.उ.बा.स.संचालक विलाससिंग इंगळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बबलु राठोड, सर्कल प्रमुख जयराम मुंडाले, एजाज देशमुख, श्याम गायगोळ, गणेश पाटील, रोहित राजपुत,गजानन जाधव,समीर शेख,माजी सरपंच विलास इंगळे आदी उपस्थित होते. पुढे बोलतांना माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा म्हणाले की, रोहित्रावर लावलेले बॉक्समधील कटआऊट, केबल उघडया स्थितीत असुन ते जिर्ण व धोकादायक स्थितीत आहे. त्यामुळे त्या रोहित्रांची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी. महावितरण अंतर्गत जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जी कामे सुरु आहे,राजकीय पाठबळ असलेले अनेक कंत्राटदार आहे ते अरेरावी करुन त्या माध्यमातून निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्यांची व त्याला मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांची खैर नाही, आपण चांगल्या प्रकारची कामे करा असा इशारा देखील याप्रसंगी सानंदांनी दिला. आता गणेशोत्सव आहे गणेशोत्सवामध्ये विद्युत खंडीत होता काम नये.शेतकऱ्यांना दिवसा ८ तास लाईन देता यावी यासह अनेक विषयांवर चर्चा झाली.ज्यांना सिंगल फेजवरुन मिटर आहे परंतू त्यांना नियमानुसार विज पुरवठा होत नाही अश्यांना दिवस-रात्र विज पुरवठा देण्यात यावा.

शेती पंपासाठी थ्री फेज विजपुरवठा सुरळीत ठेवावी. अनेक कुटुंब शेतात राहतात परंतु रात्रीच्या वेळेस वीज पुरवठा खंडित राहत असल्यामुळे साप,विंचू तसेच अन्य प्राण्यांपासून शेतकरी बांधव व त्यांच्या कुटुंबियांना धोका संभवतो व त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.नैसर्गिक परिस्थितीमुळे अडचणीचा सामना करावा लागत असल्यामुळे आपण चांगल्या प्रकारची कामे करावी,बळीराजा हा देशाचा पोशिंदा आहे,बळीराजावर जर अन्याय झाला तर मी सत्तेमध्ये असलो तरी आपला कारभार सुधारला नाही व भ्रष्टाचार करणाऱ्या कंत्राटदारांनां पाठीशी घातले तर लोकप्रिय पालकमंत्री मकरंद आबा पाटील व संबंधीत मंत्री महोदयांकडे याबाबत तक्रार करणार तसेच या ठिकाणी मोठया प्रमाणावर शेतकरी बांधवांना घेवुन आंदोलन करेल व त्याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण व संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर राहील असेही यावेळी सानंदांनी सांगितले. यावेळी तानाजी चव्हाण,राजेंद्र जाधव,सुधाकर जाधव,गणेश इंगळे, प्रदिप इंगळे, पुरुषोत्तम भोसले, शेषराव भोसले, शेख साबीर शेख लाल,बाळु वाघमारे, अर्जुन गुजर,अरविंद अंभोरे,मयुर सातव,कुणाल राजपुत,प्रणव बिल्लारे, तुकाराम वाघमारे,सतीष सोळंके,योगेश बिल्लारे,संकेत गवई,संदिप दाभाडे,रामेश्वर अंभोरे, अभिषेक हिवरखेडे, अक्षय बदरखे यासह असंख्य शेतकरी बांधवांची उपस्थिती होती.

# मुलबाळ होत नसल्याच्या कारणावरुन छळ केल्याने महिलेची आत्महत्या

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**नांदुरा रू** मुलबाळ होत नसल्याच्या कारणावरून मानसिक छळ केल्याने ज्योती गजानन मालगे या महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १७ सप्टेंबर रोजी शहरातील माळीपुरा परिसरात घडली. सौ ज्योती गजानन मालगे असे मृतक महिलेचे नाव आहे

याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी पती व सासूविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत प पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार दिपक कैलास वरुळकार (वय ३२, रा. अंत्रज, ता. खामगाव) यांच्या बहिणीचा विवाह आरोपी गजानन प्रभाकर मालगे याच्यासोबत सुमारे ८ वर्षांपूर्वी झाला होता. विवाहानंतर त्यांना अपत्य झाले नव्हते. त्यासाठी खामगाव येथील शिरसाठ हॉस्पिटलमध्ये तिच्यावर उपचार सुरू होते. डॉक्टरांनी टेस्ट ट्यूब बेबी उपचाराचा सल्ला दिला होता. मात्र. या उपचारासाठी पती गजानन मालगे व सासू विमलबाई मालगे यांचा विरोध असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच, 'तुला मुलबाळ होत नाही, विनाकारण आमच्या दवाखान्यात पैसे खर्च करत आहेस,' असे बोलून सासू तिचा मानसिक छळ करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. रक्षाबंधनाच्या सणानिमित्त माहेरी आल्यानंतर संबंधित महिलेने आपल्या भावाला सासरी होत असलेल्या त्रासाबाबत माहिती दिली होती. त्यानंतर १७सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास तिने माळीपुरा येथील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी दिपक वरुळकार यांच्या तोंडी तक्रारीवरून नांदुरा पोलिसांनी कायमी अप. क्र. ५९१/२०२६, कलम १०८, ३(५) बीएनएस अन्वये गजानन प्रभाकर मालगे व विमलबाई प्रभाकर मालगे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास मपोउपनि आवारे करीत आहेत.

# पोलीस मित्र गणराया पुरस्कार 2026 स्पर्धेत सहभागी व्हा - ठाणेदार निमीष मेहेत्रे

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**शेगांव रू** बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या संटल्पनेतुन पोलीस मित्र गणराया पुरस्कार २०२६च्या स्पर्धेत शेगांव शहरातील सार्वजनीक उत्सव मंडळांनी मोठ्या संखेने सहभागी व्हावे असे शेगांव शहर पो स्टेचे ठाणेदार निमीष मेहेत्रे यांनी केले आहे या स्पर्धेत आदर्श गणराया उत्सव ५० गुण आणि मिरवणुक ५०गुण अशा दोन निकषावर आधारित आहे पहिल्या निकषा मधे रक्तदान शिबिर ,वृक्षारोपण ,व्यसनमुक्ति व सायबर अवेअरनेस आरोग्य कॅम्प व इतर सामाजिक उपक्रम सामाजिक उपक्रमांना दहा गुण तसेच सामाजिक सलोखा व शांततापूर्ण उत्सव दहा गुण मूर्तीची सुबक सजावट ,देखावे परिसर स्वच्छता, शाडू मातीची मूर्ती ,यांना दहा गुण प्लास्टिक थर्माकोलचा वापर टाळणे तसेच मंडळाद्वारे, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरा चा वापर करणे दहा गुण संस्कृती स्पर्धा दहा गुण असे पहिल्या निकषाचे आधार आहेत तसेच दुसऱ्या निकषावर लेझीम डीजे चा वापर न करता मिरवणुकी दरम्यान पारंपारिक वाद्यांना प्राधान्य दहा गुण स्वयंसेवक नेमुन वाहतूक व्यवस्था व मिरवणूक दरम्यान पोलिसांना सहकार्य करून चांगली शिस्त व वर्तन दाखवणे दहा गुण. पोलीस स्टेशन परवान्यातील नियमांचे काटेकोर पालन करणे दहा गुण पर्यावरण पूरक कृत्रिम विसर्जन व्यवस्थेत प्राधान्य अशा या १०० गुणांच्या निकषावर जास्तीत जास्त गुण घेणाऱ्या मंडळांना स्पर्धेमध्ये पोलीस मित्र गणराया पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात येईल शिस्तबद्ध उत्सव सुरक्षित समाज या संकल्पनेला घेऊन पर्यावरणाची जपणूक सामाजिक एकता कायद्याचे पालन पोलिसांसोबत सहकार्य असे या उत्सवा दरम्यान आदर्श गणेश उत्सव साजरा व्हावा अशी पोलीस प्रशासनाची संकल्पना आहे यासाठी पंच समीती गठीत करण्यात आली आहे

**पुरस्कार समीती गठित !**

पोलीस मित्र गणराया पुरस्कार २०२६ या स्पर्धेसाठी शेगाव शहरात मंडळाचे निरीक्षण करून गुण देण्यासाठी एक समिति स्थापन करण्यात आली आहे यामध्ये शेगाव शहरातील ज्येष्ठ समाजसेवक पांडुरंग बुच सुप्रसिद्ध गायनॅकॉलॉजिस्ट डॉक्टर अंजुषा भुतडा तसेच डॉक्टर रवींद्र कराळे तसेच सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र शेगोकार व पत्रकार प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ पत्रकार नंदूभाऊ कुळकर्णी अँड प्रथमेश माने यांची समिति गठित तरी सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन ठाणेदार मेहेत्रे यांनी पोलीस प्रशासनाच्या वतीने केले आहे

# दारूच्या नशेत सुसाट दुचाकी चालवणाऱ्या चालकावर तहसिल चौकात कारवाई

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**मलकापूर:** दारूच्या नशेत बेधुंद होऊन अनियंत्रितपणे दुचाकी चालवणाऱ्या एका तळीरामावर मलकापूर शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने तहसिल चौकात धडक कारवाई केली आहे.

१६ सप्टेंबर रोजी सायंकाळी पावणेसात वाजेच्या सुमारास मलकापूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर राठोड हे तहसिल चौकात वाहतूक नियमांचे कर्तव्य बजावत होते. यादरम्यान मुक्ताईनगर रस्त्याकडून तहसिल चौकाकडे येणारी एक बजाज सी.टी. १०० मोटारसायकल (क्रमांक एमएच-२८-बीएफ-४९२१) अत्यंत अनियंत्रितपणे व वाकडीतिकडी चालवत येत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलीस कर्मचाऱ्यांनी पंचांसमक्ष दुचाकी थांबवून चालकाची विचारणा केली असता, चालकाने आपले नाव महादेव दुर्योधन पाथरकर (वय ४२, रा. काळेगाव, ता. मलकापूर) असे अडखळत सांगितले. पोलिसांना व पंचांना त्याच्या तोंडाचा दारूचा तीव्र वास आल्याने त्याला परवान्याबाबत विचारले; मात्र त्याच्याकडे कोणताही परवाना नव्हता. त्यानंतर पोलिसांनी त्याला वैद्यकीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय मलकापूर येथे नेले असता, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तो मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत असल्याचे लेखी अभिप्रायाद्वारे स्पष्ट केले.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर राठोड यांच्या रिपोर्टवरून आरोपी महादेव पाथरकर याच्याविरुद्ध मलकापूर शहर पोलीस ठाण्यात मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# 192 विस्थापित कुटुंबांचा पुनर्वसनासाठी आक्रोश

## लहुजी नगरातील बेघर कुटुंबांना पर्यायी जागा देण्याची मागणी

प्रतिनिधी १८ सप्टेंबर



**शेगाव :** क्रीडा संकुलाच्या कामासाठी लहुजी नगर मुरारका शाळेजवळ येथील अतिक्रमण हटविल्यानंतर बेघर झालेल्या १९२ कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या कुटुंबांना तातडीने पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, या मागणीसाठी बुधवारी शेगाव नगरपरिषदेत निवेदन देण्यात आले. नगराध्यक्ष प्रकाश एकनाथ शेगोकार यांना हे निवेदन साद करण्यात आले. विशेष म्हणजे, या विस्थापित कुटुंबांच्या पुनर्वसनाबाबत बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालय, खामगाव उपविभागीय अधिकारी कार्यालय तसेच शेगाव तहसीलदार कार्यालयाकडून नगरपरिषदेला योग्य ती कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, प्रशासकीय पत्रव्यवहार होऊनही प्रत्यक्ष कार्यवाही अद्याप झालेली नसल्याचा आरोप उपस्थितांनी केला. अतिक्रमण हटविल्यानंतर १९२ कुटुंबांचा निवारा हिरावला गेला. त्यामुळे या कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्न केवळ कागदोपत्री न ठेवता त्यांना हक्काची पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी माजी न.पा. उपाध्यक्ष नितीन शेगोकार, नगरसेवक अंबादास इंगळे, झोपडपट्टी सुरक्षा दलाचे जी. ओ. तायडे आणि संजय जाधव यांच्यासह विस्थापित महिला उपस्थित होत्या. यावेळी सुनीता तायडे, कोमल तायडे, अरुणा म्यात्रे, कुसुमाबाई वानखडे, कमला सावळे, देवकाबाई नुपनारायण, रायमीन बी आणि पुष्पा वानखडे यांनीही उपस्थिती नोंदविली. प्रशासकीय निर्देशांची दखल घेऊन नगरपरिषदेने तातडीने कार्यवाही करावी आणि १९२ विस्थापित कुटुंबांना न्याय द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# गतिरोधकांमधील अंतर बुजविले; नागरिकांना दिलासा

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**खामगाव :** प्रभाग क्रमांक १३ मधील गतिरोधकांमध्ये राहिलेल्या अंतरामुळे वाहनचालक तसेच नागरिकांना होत असलेल्या अडचणींची दखल घेत अखेर संबंधित ठिकाणी दुरुस्तीची कार्यवाही करण्यात आली. वेळोवेळी अतांत्रिक गतिरोधकाचा मुद्दा ऐरणीवर आला होता. सततच्या पाठपुराव्यानंतर गतिरोधकांमधील आवश्यक ठिकाणचे अंतर बुजविण्यात आल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. प्रभागातील काही रस्त्यांवर वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी गतिरोधक उभारण्यात आले आहेत; मात्र या गतिरोधकांमध्ये काही ठिकाणी अंतर राहिल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. तसेच या ठिकाणाहून ये-जा करणाऱ्या नागरिकांनाही त्रास सहन करावा लागत होता. याबाबत काही नागरिकांनी नगरसेविका रुपाली गजानन मुळीक यांच्याकडे तक्रारी मांडल्या होत्या. त्यानंतर संबंधित यंत्रणेकडून गतिरोधकांमधील राहिलेले अंतर बुजविण्याची कार्यवाही करण्यात आली. त्यामुळे रस्त्यावरील गतिरोधकांची रचना अधिक व्यवस्थित झाली असून वाहनचालकांना होणारा त्रास कमी होण्यास मदत होणार आहे. समस्या मार्गी लागल्याने प्रभागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# खामगावात स्वच्छतेची जनजागृती रॅली

## संत गाडगेबाबा, वासुदेवांच्या वेशभूषेतील पात्रे अवतरली

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**खामगाव :** हातात स्वच्छतेचे फलक, ओठांवर जनजागृतीची घोषवाक्ये आणि संत गाडगेबाबा व वासुदेवांच्या वेशभूषेत सहभागी झालेले कार्यकर्ते, अशा अनोख्या वातावरणात गुरुवारी खामगाव शहरात स्वच्छतेचा जागर करण्यात आला. 'स्वच्छता सेवा संकल्प अभियान' अंतर्गत खामगाव नगरपरिषदेच्या वतीने काढण्यात आलेल्या स्वच्छता जनजागृती रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेत स्वच्छ, सुंदर व निरोगी खामगावचा संदेश दिला. सायंकाळी ५ वाजता नगर परिषद प्रशासकीय कार्यालयापासून रॅलीला सुरुवात झाली. नगर परिषद उपाध्यक्ष संतोष पुरोहित यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा प्रारंभ केला. यावेळी आरोग्य सभापती प्रवीण कदम, उपमुख्याधिकारी आनंद देवकते, आरोग्य अभियंता अतुल,गौरव बोबडे यांच्यासह नगरपरिषद अधिकारी, कर्मचारी, नगरसेवक आणि आरोग्य विभागाचे पथक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीत स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करणारे फलक, घोषवाक्ये आणि विविध संदेश सादर करण्यात आले. संत गाडगेबाबा व वासुदेवांच्या वेशभूषेतील सहभागींच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

**शहरातील विविध भागांतून रॅली मार्गक्रमण करत असताना नागरिकांचे सहकार्याचे आवाहन**

कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता न करणे आणि आपल्या परिसराची स्वच्छता राखणे, यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. 'स्वच्छता सेवा संकल्प अभियान' हा केवळ प्रशासनाचा उपक्रम न राहता लोकसहभागातून व्यापक चळवळ व्हावी, यासाठी नागरिकांनी स्वतः स्वच्छता राखून इतरांनाही त्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# कबड्डी स्पर्धेत कै.व्ही.एन.लाहुडकर विद्यालयाची जिल्हास्तरावर निवड!



प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**मलकापूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मलकापूर तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२६-२७' पार पडल्या. या स्पर्धेतील १४ वर्षांखालील मुलांच्या मैदानी कबड्डी सामन्यात लोकसेवा शिक्षण समिती, दसरखेड द्वारा संचलित कै. वसंतराव नारायणराव लाहूडकर (पाटील) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या कबड्डी संघाने प्रथम क्रमांक पटकावून जिल्हा स्तरावर धडक मारली आहे. संघाचा कर्णधार शुभम बिन्हाडे आणि उपकर्णधार दिपक बिन्हाडे यांच्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर संघाने विजयश्री खेचून आणली. पुढील जिल्हास्तरीय सामने जी. व्ही. मेहता विद्यालय, खामगाव येथे पार पडणार आहेत. याआधीही विद्यालयाने विविध क्रीडा प्रकारांमध्ये चमकदार कामगिरी केली असून, वेटलिफ्टिंग स्पर्धेत आदर्श महानुभाव याने रौप्य पदक पटकावले आहे, तर कॅरम स्पर्धेत कु. देवयाणी दिपक खराटे हिने उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. कबड्डी संघाच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव राजूभाऊ साठे, मुख्याध्यापक एम. ओ. करपे, प्रा. सचिन राऊत प्रा. अरुण बारोटे; शिक्षक संतोषकुमार चव्हाण आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे दसरखेड गावात आनंदाचे वातावरण पसरले असून ग्रामस्थ व पालकांकडून सर्व यशस्वी खेळाडूंचे कौतुक होत आहे तसेच पुढील जिल्हास्तरीय सामन्यांसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# जनता महाविद्यालयात विद्यापीठ मान्यताप्राप्त टॅली प्राईम इंग्रजी संभाषण कौशल्य अभ्यासक्रमांचा शुभारंभ

प्रतिनिधी १८ सप्टेंबर



**मलकापुर:** स्थानिक लोकसेवा बहुउद्देशीय मंडळ संचलित जनता कला-वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर येथील वाणिज्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणासोबतच आधुनिक व रोजगाराभिमुख कौशल्यांची जोड मिळावी, या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मान्यताप्राप्त ्टॅली प्राईमतसेच कम्युनिकेशन स्किल्स इन इंग्लिशज् या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा उद्घाटन सोहळा १६ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधीर डी. चव्हाण होते, तर प्रमुख अतिथी म्हणून जनता कला-वाणिज्य महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. एन. एस. खर्चे उपस्थित होते. इंग्रजी विभाग प्रमुख डॉ एल.जी.कोलते व वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनील लक्ष्मण माळी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व संत गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर प्राचार्य डॉ. सुधीर डी. चव्हाण यांनी प्रमुख अतिथींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनील लक्ष्मण माळी यांनी दोन्ही प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची उद्दिष्टे, स्वरूप आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यातील करिअरच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व विशद केले. वाणिज्य विभागाच्या प्रा. डॉ. रूपाली पुंजाजी इंगळे यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. याप्रसंगी मागील सत्रात हे प्रमाणपत्र अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये नंदिनी दीक्षित, पूनम परदेशी, वेदिका जोशी आणि साक्षी धाके यांनी टॅली प्राईमच्या माध्यमातून संगणकीय लेखांकनाचा (ष्टशद्बश्चह्वह्लद्गह् म्द्ब5द्गस्र ्रष्ष्शह्वठ्ठह्लद्बठ्ठद्द) मिळालेला प्रत्यक्ष अनुभव तसेच इंग्रजी संभाषण अभ्यासक्रमामुळे आत्मविश्वासात झालेली वाढ याविषयीचे अनुभव मांडले. प्रमुख अतिथी माजी प्राचार्य डॉ. एन. एस. खर्चे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, बदलत्या रोजगारविश्वात ज्ञान, कौशल्य, संवादक्षमता आणि व्यावहारिक अनुभव यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी पदवी शिक्षणासोबत अशा कौशल्याधारित अभ्यासक्रमांचा लाभ घेऊन स्वतःला सक्षम बनवावे, असे प्राचार्य डॉ. सुधीर डी. चव्हाण यांनी सांगितले.

# शाळेच्या चाबीवरून आणि पोषण आहारावरून वाद; मुख्याध्यापकासह चौघांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**मलकापूर:** तामीर-ए-मिल्लत उर्दू प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेच्या चाबीवरून तसेच शालेय पोषण आहारावरून वाद घालून शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी चार जणांविरुध्द मलकापूर शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायकलपुरा येथील तामीर-ए-मिल्लत उर्दू प्राथमीक व उच्च प्राथमीक शाळेचे मुख्याध्यापक नजरुल्ला खान नसरुल्ला खान (वय ५४) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १२ ते १६ सप्टेंबर दरम्यान आरोपी शेख हारुण शेख यासीन, शेख अहेमद शेख गुलाम दस्तगीर व मोहम्मद आतीफ अब्दुल लतीफ यांनी मुख्याध्यापकांच्या सहाय्यकाकडून शाळेची चाबी बळजबरीने हिसकावून घेतली. मुख्याध्यापकांनी विचारणा केली असता आरोपींनी अश्लील शिवीगाळ, धक्काबुक्की करत जीवे मारण्याची धमकी दिली व मुख्य गेटला कुलूप ठोकले. यानंतर १६ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता शालेय पोषण आहाराचा माल उतरवण्याच्या कारणावरून आरोपींनी पुन्हा वाद घातला.

या वेळी संस्थेचे सचिव मोहम्मद रफीक अब्दुल सईद व मध्यस्थीसाठी आलेले दुकानदार मोहम्मद असलम फारुक यांना आरोपी शेख अहेमद याने अश्लील शिवीगाळ केली. तसेच आरोपी उजमा परवीन शेख हारुण हिने मोठ्याने ओरडून रेपच्या गुन्ह्यात फसवून देईन अशी धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी मुख्याध्यापक नजरुल्ला खान यांच्या तक्रारीवरून मलकापूर शहर पोलीस स्टेशनला आरोपींविरुध्द अप.नं. ६८६/२०२६, कलम २९६, ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत झेंडगे करीत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
८
शुक्रवार, दि.१८ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# अकोल्यात 4.15 लाखांचे 593 किलो कालबाह्य तूप जप्त

## अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई; दोन दुकानांचे परवाने निलंबित

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अकोला :** शहरातील खाद्य आस्थापनांची अन्न व औषध प्रशासनाने दोन दिवसीय विशेष तपासणी मोहीम राबवून मोठी कारवाई केली आहे. अकोला शहरातील दोन नामांकित फर्म्समध्ये विक्रीसाठी ठेवलेला तब्बल ५९३ किलो कालबाह्य तुपाचा साठा जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत ४,१५,०९३ रुपये आहे. या गंभीर निष्काळजीपणाबद्दल दोन्ही आस्थापनांचे अन्न परवाने तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहेत.

एफडीएचे सहआयुक्त दे. गो. वीर यांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ आणि १७ सप्टेंबर २०२६ रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने शहरातील विविध खाद्य प्रतिष्ठानांची तपासणी केली. त्यात पूर्वा मार्केटिंग येथील तपासणीत येथे १५ वेगवेगळ्या प्रकारच्या कालबाह्य तुपाचा साठा आढळून आला. प्रशासनाने ४५८ किलो तूप जप्त केले असून त्याची अंदाजे किंमत ३,३४,०९३ रुपये आहे.



मेसर्स लीलाधर जगजीवन येथे १७ सप्टेंबर रोजी या फर्मवर छापा टाकण्यात आला. येथे 'वटुला प्रीमियम घी' या ब्रँडचा कालबाह्य साठा विक्रीसाठी ठेवलेला आढळला. पथकाने येथील १३५ किलो तूप जप्त केले असून त्याची किंमत ८१,००० रुपये आहे. ही धडक कारवाई अमरावती विभागाचे सह आयुक्त (अन्न) श्री. एस. डी. केदारे आणि अकोल्याचे सहाय्यक आयुक्त (अन्न) श्री. डी. जी. वीर यांच्या मार्गदर्शनात अन्न सुरक्षा अधिकारी आर. डी. सोळंके व कि. ह. बोरचाटे यांच्या पथकाने केली.

## संभाव्य पाणी टंचाईवर आमदार हरिष पिंपळेंची तातडीची बैठक



प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**मुर्तिजापूर :** तालुका प्रतिनिधी
महान धरणातील उपलब्ध पाणीसाठा अत्यल्प झाल्याच्या पार्श्वभूमीवर आगामी काळात मुर्तिजापूर तालुक्यातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी आमदार हरीश मारोतीआप्पा पिंपळे यांनी प्रशासनासोबत तातडीची आढावा बैठक घेतली. संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन पर्यायी पाणीपुरवठ्याच्या स्रोतांचा शोध घेण्यासह आवश्यक उपाययोजनांबाबत यावेळी अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

महान धरणातील पाणीसाठा सध्या सुमारे २० टक्क्यांवर आला आहे. उपलब्ध पाणी अकोला शहरासाठी राखीव ठेवण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने मुर्तिजापूर तसेच बार्शिटाकळी तालुक्यातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणीटंचाई निर्माण होण्यापूर्वीच प्रशासनाने पर्यायी व्यवस्था करण्याची आवश्यकता असल्याचे आमदार पिंपळे यांनी बैठकीत स्पष्ट केले.बैठकीला मुर्तिजापूरचे उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे, मुर्तिजापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष हर्षल साबळे, मुख्याधिकारी निलेश जाधव, नगर अभियंता तसेच बार्शिटाकळीचे तहसीलदार आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मंगरूळ कांबे, दगडपारवा परिसरातील पाण्याचा पर्याय

मुर्तिजापूर व बार्शिटाकळी तालुक्यांसाठी पर्यायी पाणीस्रोत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंगरूळ कांबे, दगडपारवा तसेच घुमशी-मुंगशी परिसरातील उपलब्ध अतिरिक्त पाण्याचा वापर करता येईल का, यावर बैठकीत चर्चा करण्यात आली. या स्रोतांमधून पाणी उपलब्ध झाल्यास ते मुर्तिजापूर, बार्शिटाकळी तसेच अकोला तालुक्यातील गरजू भागांना पुरविण्याच्या शक्यतांचा अभ्यास करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## अकोला कृषि विद्यापीठात रविवारपासून खरीप शिवार फेरी!

### कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांचे हस्ते उदघाटन

प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**अकोला :** विद्यापीठ स्थापना दिनाचे औचित्य साधत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन तथा प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र राज्य यांचे संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय खरीप शिवार फेरी रविवार, २० सप्टेंबरपासून सुरू होत आहे.

याचे उद्‌घाटन कृषिमंत्री तथा डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे प्रतिकुलपती ना.दत्तात्रय भरणे यांचे हस्ते रविवार सकाळी ११ वाजता होणार आहे. कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ना.ॲड. आकाश फुंडकर यांचे अध्यक्षतेत होणाऱ्या या उद्‌घाटन सत्राचे प्रसंगी, राज्याचे कृषि राज्यमंत्री ना.ॲड. आशिष जयस्वाल विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या प्रसंगी महाराष्ट्र विधानसभा विधिमंडळ पक्ष मुख्य प्रतोद (मंत्री दर्जा) आ. रणधीर सावरकर, अकोला शहराच्या प्रथम नागरिक महापौर शारदा खेडकर, अकोला जिल्ह्याचे युवा खासदार अनुप धोत्रे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद पुणेचे उपाध्यक्ष तुषार पवार, राज्याचे कृषि सचिव परिमल सिंग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू कर्नल प्रा.(डॉ). शरद गडाख, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी, बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोलीचे कुलगुरू डॉ.संजय भावे, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ.नितीन पाटील, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीच्या कृषि विस्तार शाखेचे उपमहासंचालक छॉ.राजवीर सिंग आदी अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या उद्‌घाटन प्रसंगी आ. ॲड. किरण सरनाईक,आ. वसंत खंडेलवाल, आ. धीरज लिंगाडे, आ. प्रकाश भारसाकळे, आ. हरीश पिंपळे, विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य आ. अमित झनक, विधानसभा सदस्य आ. नितीन देशमुख, विधानसभा सदस्य आ. साजिद खान पठाण, राज्याचे कृषी आयुक्त सुरज मांढरे, आदी उपस्थित राहणार आहेत.



**शिवार फेरीसाठी जिल्हानिहाय कार्यक्रम**

२० सप्टेंबर - अकोला, वाशिम, बुलढाणा आणि गोंदिया जिल्हा

२१ सप्टेंबर - वर्धा, नागपूर आणि गडचिरोली जिल्हा

२२ सप्टेंबर - अमरावती, यवतमाळ, भंडारा, आणि चंद्रपूर जिल्हा.




## गावागावात प्रशासकराज; हातरुण ग्रामपंचायतीचा विकास खुंटला




प्रतिनिधी १८ सप्टेंबर

**हातरूण :** ग्रामपंचायतीच्या निवडणुका लांबत असल्याने गावागावात प्रशासकीय कारभार सुरू असून, हातरूण ग्रामपंचायतीच्या विकासकामांवरही त्याचा परिणाम होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपल्यानंतर प्रशासकीय यंत्रणेकडून ग्रामपंचायतीचा कारभार पाहिला जात आहे. मात्र, स्थानिक पातळीवरील विविध प्रश्न आणि विकासकामांना अपेक्षित गती मिळत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

हातरूण गावात रस्ते, नाली व्यवस्था, स्वच्छता,, पथदिवे तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेले स्थानिक प्रतिनिधी नसल्यामुळे नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी आणि त्यावर तातडीने पाठपुरावा करण्यासाठी अडचणी येत असल्याचेही बोलले जात आहे. निवडणुका लांबल्याने ग्रामपंचायतीच्या दैनंदिन व्यवहारांवर आणि निर्णयप्रक्रियेवर विविध प्रशासकीय मर्यादा येत असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये आहे.

त्यामुळे रखडलेली कामे मार्गी लागावीत, उपलब्ध निधीचा योग्य वापर व्हावा आणि गावातील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## आधी वंदू तुज मोरया...



श्री शास्त्री नगर त्रिमूर्ती गणेशोत्सव मंडळ अकोला



श्री गायत्री माता गणेशोत्सव मंडळ बाळापूर नाका अकोला



मारवाडी प्रेस गणेशोत्व मंडळ,अकोला



गौरक्षण रोडचा राजा गणेशोत्व मंडळ,अकोला



न्यू तापडिया नगर गणेशोत्सव,अकोला



प्रसाद कॉलनीचा राजा,अकोला

## अकोला जिल्हा जेष्ठा गौरी दर्शन



नंदकुमार टकोरे, हरिहर पेठ अकोला



ज्ञानेश्वर बोराखडे, रेखा प्लाट खामगाव



कुलदीप सिंग ठाकूर, हिंगणा रोड



श्याम वाफधाने, डाबकीरोड पोलिस वसाहत



राजेंद्र गोतमारे हिंगणा रोड,अकोला



अरुण कुमार शर्मा, डाबकी रोड़ अकोला

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135